



# गोदातीर समाचार


RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६४ वे * अंक २०६ * नांदेड * शनिवार, दि. २ ऑगस्ट २०२५ * पृष्ठे १२ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211




प्रसिध्द कवी हरिवंशराय बच्चन यांनी 'अग्निपथ' या शब्दाचा अर्थ खडतर धगधगत्या मार्गावर चालणे असे सांगितले आहे. अडचणीवर मात करुन पुढे चालत राहण्याचा संदेश 'अग्निपथ'मधून दिला आहे. प्रत्येक व्यक्तीने आपल्या जीवन प्रवासात येणाऱ्या अडचणीवर मात करुन पुढे चालत रहावे. जीवन प्रवासात कितीही संकटे आली तरी न डगमगता त्या संकाटावर मात करुन आपले 'लक्ष्य' साध्य करण्याची जिद्द सोडली नाही पाहिजे. लक्ष्य प्राप्ती होईपर्यंत ना थकलं पाहिजे, ना थांबलं पाहिजे आपला खडतर जीवन प्रवास शेवटपर्यंत सुरुच ठेवला पाहिजे असा संदेश कवींनी आपल्या कवितेतून दिला आहे. कवी हरिवंशराय बच्चन यांच्या कवितेतील 'अग्निपथ' सारखं राजकीय जीवन प्रवास मन्याड खोऱ्याचा ढाण्या वाघ लोकनेता आ.प्रताप पाटील चिखलीकर यांचा आहे.

विद्यार्थी दशेपासूनच त्यांना राजकारणाची आवड आहे. कॉलेजमध्ये शिकत असताना विद्यार्थ्यांचे संघटन बांधणीचा छंद त्यांना जडला. चिखलीकर घराण्याची कोणतीही मोठी राजकीय पार्श्वभूमी नसतानाही प्रतापरावांनी स्वबळावर सरपंच ते खासदार, तीन वेळा आमदार असा दमदार खडतर राजकीय प्रवासाचा एक मोठा पल्ला गाठला आहे. कॉलेज जीवनात प्रतापरावांना शिक्षणात फारशी रुची नव्हती, त्यामुळेच ते बारावीला नापास झाले. नापास झाल्यानंतर त्यांची रवानगी गावाकडे झाली. कै.गोविंदराव पाटील चिखलीकर यांची इच्छा होती, प्रतापनं नौकरी करावं, अधिकारी व्हावं असे वडीलांचे स्वप्न होते. वडिलांचे स्वप्न पायदळी तुडवित प्रतापराव यांनी होलसेल किराणा दुकान चिखली गावात टाकले. पाटलाच्या लेकराला व्यापार कसं जमणार होतं. दुकान टाकलं. परिसरातील छोटे किराणा दुकानदार पाटलांच्या दुकानातून सामानाची खरेदी करु लागले. दुकानातील माल खाली झालं पण गल्ला रिकामीच राहिला. पाटलांनी उधारीत सामानाची विक्री केली. उधारी वसुल झाली नाही आणि दुकान बंद झालं. किराणा दुकान बंद झाल्यानंतर प्रतापरावांनी मालवाहू ट्रक घेतली. ट्रक चालविण्याच्या निमित्ताने पुणे-मुंबई शहरात जाणे-येणे वाढले. प्रतापरावांना त्यामुळेच मुंबईच्या गल्लीबोळातील रस्ते आजही लक्षात आहेत. किराणा दुकानाप्रमाणेच ट्रकच्या व्यवसायाची पुनरावृत्ती झाली. वडील गोविंदराव पाटील यांनी प्रतापरावांना घेवून सहकार महर्षी पद्मश्री श्यामराव कदम यांच्याकडे गेले. साहेब, प्रतापरावाला बँकेत चिटकवा अशी विनंती केली. कांही दिवस बँकेतही त्यांनी काम केलं पण त्यांच मन तिथेही रमले नाही. लहानपनापासूनच गोविंदराव पाटील प्रतापरावांना 'राव' म्हणत होते.

नको धंदा, नको नौकरी म्हणत प्रतापराव चिखली गावच्या ग्रामपंचायतच्या निवडणूकीत भाग घेतला आणि गावकऱ्यांनी त्यांना सरपंच केले. प्रतापरावांच्या राजकीय आयुष्याला चिखली गावच्या सरपंचापासून सुरुवात झाली. कै.गोविंदराव पाटील चिखलीकर हे कै.कुसुमताई शंकरराव चव्हाण याना बहिण मानली होती. कै. कुसुमताई चव्हाण व गोविंदराव पाटील हे दोघेही सख्ख्या बहिण-भावांसारखं नातं शेवटपर्यंत जपले. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते कै.शंकरराव चव्हाण यांचे चिखलीकरांच्या घरी नेहमी येण-जाणं होतं. कै. शंकरराव चव्हाण यांच्या संस्कारात तरुण वयात प्रतापरावांची काँग्रेस संस्कृतीत राजकीय जडण घडणं झाली. कोर्या कागदावर प्रतापरावांना शंकररावांनी शाळा मंजूर केली. त्या शाळेच नांव कुसुमताई चव्हाण विद्यालय असे ठेवण्यात आले. महाविद्यालयीन जीवनापासूनच संघटन कौशल्य अस्मसात केलेले प्रतापराव तारुण वयात युवक काँग्रेसचे प्रदिर्घकाळ नेतृत्व केले. प्रतापरावांतील नेतृत्वाचे गुण हेरुन १९९२ साली जिल्हा परिषदेच्या निवडणूकीत काँग्रेसचे तिकीट शंकररावांनी दिले. शिक्षणात मागे असलेला हा तरुण राजकारणाच्या परिक्षेत एका झटक्यातच पास होवून जिल्हा परिषदेची निवडणूक जिंकून सदस्य झाला. थांबणे हा प्रतापरावांच्या स्वभावातच नाही. जि.प.सदस्य होताच लगेच सभापतीच्या स्पर्धेत उतरले. कै.गंगाधरराव कुटूंरकर हे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होते. कै.शंकरराव चव्हाण यांनी प्रतापरावांना सभापती करण्याचा आदेश गंगाधरराव कुंटूरकरांना दिला. त्यावेळी कुंटूरकर म्हणाले, पोरासोराला घेवून जिल्हा परिषद चालू का? असा थेट सवाल केला. कुंटूरकरांच्या सवालामुळे शंकरराव संतप्त झाले आणि त्यांनी कुंटूरकरांच्या जि.प.क्वॉटरमधून रागारागाने बाहेर पडले. शेवटी कुंटूरकरांना आपला शब्द मागे घ्यावा लागला आणि प्रताप गोविंदराव पाटील या तरुणाला जि.प.कृषी सभापती होण्याचा बहुमान प्राप्त झाला. सन १९९२ पासून ते आमदार होईपर्यंत प्रतापरावांनी प्रत्येक पाच वर्षांनी वेगवेगळ्या गटातून जि.प.ची निवडणूक लढवली आणि जिंकून आले. जिल्हा परिषदेतील अध्यक्ष वगळता इतर खात्याचे सभापतीपद भूषविण्याची त्यांना संधी मिळाली. राजकारणात प्रतापरावांनी कधीच मागे वळून पाहिले नाही. पराभव झाला तरी खचले नाहीत. विजय मिळाला तरी मातले नाहीत. जि.प.च्या राजकारणापासूनच प्रतापरावांना आमदारकीचे स्वप्न पडू लागले. कंधारचे तिकीट मिळविण्यासाठी दिल्ली गाठली. शंकररावांनी १९९७ मध्ये त्यांना उमेदवारी दिली कामाला लागा असा संदेश दिला होता. दिल्लीहून विमानाने प्रतापराव हैद्राबादला आले. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची जय्यत तयारी केली आणि ऐनवेळी त्यांची उमेदवारी कटली आणि ती उमेदवारी ईश्वरराव भोसीकर यांना जाहिर झाली. येथूनच त्यांच्या राजकीय जीवनातील 'अग्निपथ'प्रवासाला सुरुवात झाली. तो प्रवास आजही संपला नाही.

सन २००४ मध्ये कंधार-लोहा मतदारसंघातून चिखलीकरांना उमेदवारी मिळणार हे निश्चित झाले होते. 'घर का भेदी लंका ढाये' या प्रमाणे काँग्रेस-राष्ट्रवादीच्या जागा वाटपात कंधारची जागा राष्ट्रवादीला सोडण्यात आली. चिखलीकरांचा पत्ता कट करण्यात आला. नावातच 'प्रताप' असल्यामुळे अन्यायाविरुध्द लढा देण्याचा निर्णय घेवून 'चव्हाण' विरुध्द शंकनाद फुंकण्यात आला. अशोकराव चव्हाण यांनीच आपला पत्ता कट केल्याचा संशय मनात बाळगून प्रतापरावांनी 'अभी नही तो, कभी नही'चा नारा देत शिवाजीनगरची वाट सोडली. चव्हाण-चिखलीकर संघर्षाची ठिणगी येथेच पडली. सन २००४ च्या विधानसभा निवडणूकीत चिखलीकरांनी अपक्ष उमेदवारी दाखल केली. विद्यमान आमदार रोहिदास चव्हाण, राष्ट्रवादीचे उमेदवार शंकरअण्णा धोंडगे, अपक्ष हरिहरराव भोसीकर आणि प्रतापरावही अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूकीच्या मैदानात उतरले. निवडणूक काळात प्रारंभी फार्मात असलेले भोसीकर यांची गाडी निवडणूकीच्या अंतिम टप्प्यात बंद पडली. चिखलीकरांनी भोसीकरांना 'मॅनेज' केल्याच्या अफवा सुरु झाल्या. निवडणूक प्रचारात तिसऱ्या क्रमांकावर असलेले प्रतापराव 'भावजी पॅटर्न'मुळे हनुमान उडी घेत पहिल्या क्रमांकावर येवून पोंहचले आणि अपक्ष आमदार म्हणून निवडून आले. विधानसभेच्या निवडणूकीत मतदारांना 'भुलभूलैय्या'चा पहिला प्रयोग कंधार मध्ये झाला. पुढे तो कंधार 'पॅटर्न' संपूर्ण राज्यातील विधानसभा निवडणूकीत जावून पोंहचला. तेंव्हापासूनच विधानसभेच्या निवडणूका 'कोट्याधीश'झाल्या हे विशेष!

> 'जनता माझी,मी जनतेचा' हे ध्येय उराशी बाळगून गेल्या दोन दशकापासून समाजकारण, राजकारण करणाऱ्या आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नशिबात 'संघर्ष' हा पाचवीलाच पुंजला आहे. चिखली गावचा सरपंच ते आमदार-खासदार संघर्षमय राजकीय प्रवासातूनच झाले. संघर्षाशिवाय त्यांना राजकीय जीवनात कांहीच मिळाले नाही. नियतीच्या मनात काय आहे ते कोणालाच माहित नाही. गेल्या दोन दशकाच्या खडतर राजकीय प्रवासात त्यांनी अनेक सत्तास्थानांचे शिखर गाठले. 'लालदिव्या'च्या गाडीने मात्र त्यांना वारंवार हुलकावणी दिली. दर पाच वर्षात पक्षांतर करण्याची वेळ त्यांच्यावर नियतीने आणली आहे. आता ते जिल्ह्यात राष्ट्रवादीचे नेते झाले आहेत. सर्वच पक्षांच्या अनुभवाची शिदोरी सोबत घेवून त्यांनी धरलेली राष्ट्रवादीची 'वाट' ही कांही सोपी नाही. दादाचा परखड स्वभाव माहित असतानाही त्यांनी 'अग्निपथ'चा मार्ग स्विकारला आहे. मंत्री होण्याचे त्यांचे 'अर्धवट' राहिलेले स्वप्न ना.अजितदादा पवार हे पूर्ण करतील काय? आगामी वाढिवसापर्यंत तरी मंत्री होण्याचे चिखलीकरांचे स्वप्न पूर्ण होवो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करुन वाढदिवसानिमित्त त्यांचे अभिष्टचिंतन करतो.
>
> ■ ज्येष्ठ पत्रकार प्रल्हाद उमाटे, नांदेड.

# 'अग्निपथ'



प्रसिध्द कवी हरिवंशराय बच्चन यांनी 'अग्निपथ' या शब्दाचा अर्थ खडतर धगधगत्या मार्गावर चालणे असे सांगितले आहे. अडचणीवर मात करुन पुढे चालत राहण्याचा संदेश 'अग्निपथ'मधून दिला आहे. प्रत्येक व्यक्तीने आपल्या जीवन प्रवासात येणाऱ्या अडचणीवर मात करुन पुढे चालत रहावे. जीवन प्रवासात कितीही संकटे आली तरी न डगमगता त्या संकाटावर मात करुन आपले 'लक्ष्य' साध्य करण्याची जिद्द सोडली नाही पाहिजे. लक्ष्य प्राप्ती होईपर्यंत ना थकलं पाहिजे, ना थांबलं पाहिजे 'अग्निपथ' सारखं राजकीय जीवन प्रवास मन्याड खोऱ्याचा ढाण्या वाघ लोकनेता आ.प्रताप पाटील चिखलीकर यांचा खडतर जीवन प्रवास आहे.

अपक्ष आमदार म्हणून निडून आल्यानंतर प्रतापराव मुंबई गाठली. अशोकरावांना वाटत होतं,प्रतापरावांनी आपल्या हातात सरकारच्या पाठिंब्याचं पत्र द्यावं. 'प्रतापी' नेतृत्वाने अशोक चव्हाण यांना हुलकावणी देवून थेट विलासराव देशमुख यांची गढी गाठली आणि आघाडी सरकारला अपक्ष आमदार म्हणून बिनशर्थ पाठिंब्याच पत्र विलासरावांकडे सुपूर्द केले. चिखलीकर-चव्हाणात थेट संघर्षाला मुंबईतून प्रारंभ झाला. पुढे जिल्ह्याच्या राजकारणात सख्खे मित्र पक्के राजकीय वैरी ठरले. या दोघांतील संघर्ष रस्त्यावर सुरु झाला. चिखलीत अशोकरावांच्या गाडीवर दगडफेक करण्यात आली. लोह्यात त्यांच्यावर 'चप्पल' फेक करण्यात आली. या दोन नेत्यांत सुडाच्या राजकारणाने पेट घेतला. मुख्यमंत्री कै.विलासराव देशमुख यांची खंबीर साथ चिखलीकरांना लाभली. त्यामुळे चिखलीकर हे चव्हाणांच्या साम्राज्याला हादरे देण्यात यशस्वी झाले.

सन २००९ च्या विधानसभा निवडणूकीतही मुख्यमंत्री अशोकरावांनी चिखलीकरांना काँग्रेसचे तिकीट मिळवू दिले नाही. कंधार हा मतदारसंघ राष्ट्रवादीला सोडण्यात आलं. मुख्यमंत्री असतानाही अशोक चव्हाण यांनी राष्ट्रवादीचा उघड प्रचार करुन उमेदवार शंकरअण्णा धोंडगे यांना निवडून आणण्यासाठी मुख्यमंत्रीपदाच्या बळाचा वापर केला. अपक्ष असलेल्या चिखलीकरांचा या निवडणूकीत केवळ सात हजार मतांनी पराभव झाला. त्यावेळी चिखलीकरांना ७२ हजार मतदान झाले होते. सन २००९ च्या निवडणुकीत पराभव झाल्यानंतर मुंबईतील वरळी येथील विलासराव देशमुख यांच्या बंगल्यात त्यांना भेटण्यासाठी प्रतापराव गेले होते. विलासरावांना पाहिल्यानंतर अश्रू अनावर झाले. त्यावेळी विलासरावांनी मंत्र दिला, रडायचं नाही तर लढायचं, प्रतापराव आम्ही तुमच्या सोबत आहोत असा धीर त्यानी दिला. त्या क्षणी मी देखील उपस्थित होतो. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते उल्हास दादा पवार हेही उपस्थित होते. कै. विलासरावांचा हात पाठीवर पडताच प्रतापराव पराभवाच्या धक्क्यातून सावरले. पुन्हा जोमाने कामाला लागले. दरम्यान कै.विलासराव देशमुख यांचे अकाली निधन झाले. त्यावेळी मात्र प्रतापरावांवर 'आभाळ' कोसळल्यासारखं झालं होत. खर्या अर्थाने आज आपण राजकीयदृष्टया पोरकं झाल्याची भावना चिखलीकरांच्या मनात आली. क्षणाचाही विलंब न करता राजकारणात निराधार झालेल्या चाणाक्ष्य प्रतापरावांनी राष्ट्रवादीचे नेते ना.अजितदादा पवार यांच्या राजकीय आश्रयाला गेले. दादांनीही मोठ्या मनाने चिखलीकरांना आपला सहकारी स्विकारुन राष्ट्रवादीत प्रवेश दिला. राजकीय 'गॉड फादर' शिवाय राजकारण करणं अवघड असतं. जीवाभावाच्या कार्यकर्त्यांची टीम सांभाळण तोंडचा खेळ नाही. कट्टर राजकीय विरोधक शंकरअण्णा धोंडगे हे राष्ट्रवादीचे आमदार असतानाही चिखलीकरांनी राष्ट्रवादीत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आणि राष्ट्रवादीत दाखल झाले. चिखलीकरांच्या पक्ष प्रवेश सोहळ्याला स्वत: अजितदादा जातीने उपस्थित होते. लोह्याच्या पक्ष प्रवेश सोहळ्यात राष्ट्रवादीच्या नेत्या सुर्यकांता पाटील म्हणाल्या होत्या, दादा प्रताप फार हुशार आहे. तो अशोकरावांच्या शाळेत वाढला आहे. आज राष्ट्रवादीत प्रवेश करीत आहे. प्रताप राष्ट्रवादीत मात्र तू आमची शाळा करु नकोस असा सल्ला दिला होता. कालांतराने ताईंची शाळा कशी झाली हे सर्वांना ज्ञात आहे.

कंधार-लोहा मतदारसंघात राष्ट्रवादीचा आमदार धोंडगे व त्यांचा कट्टर विरोधक चिखलीकरही राष्ट्रवादीतच 'एक म्यान, दो तलवार' अशी अवस्था निर्माण झाली होती. आ.शंकर धोंडगे हे मोठ्या पवारांचे समर्थक तर चिखलीकर हे धाकट्या पवारांचे समर्थक म्हणून ओळखू लागले. दादांच्या आशिर्वादाने प्रतापरावांनी मतदारसंघातील कार्यकर्त्यांची फळी जीवंत ठेवली. सर्वसामान्याच्या कामाची सोडवणूकही दादांमार्फत करुन घेतली. चार वर्षाच्या कालावधीत राष्ट्रवादीत 'प्रतापराव बोले, दादा डोले' अशी अवस्था निर्माण झाली होती. सन २०१४ च्या विधानसभा निवडणूकीची चाहूल लागली. मोठ्या पवार साहेबांनी शंकर धोंडगे यांचीच उमेदवारी फायनल करण्याचे संकेत चिखलीकरांना मिळाले. चाणाक्ष्य चिखलीकरांनी थेट दादांना गाठून माझ्या उमेदवारीचं राष्ट्रवादीत कांही खरं दिसत नाही, काय करु असा सल्ला विचारला, तेंव्हा मोठ्या उदार अंतकरणाने दादा म्हणाले, 'गेल्या घरी, सुखी राहा' असा कानमंत्र दिला.

त्याच वेळी राष्ट्रवादी सोडण्याचा निर्णय प्रतापरावांनी केला होता. नांदेडला आल्यावर आपल्या मित्रमंडळातील जीवाभावाच्या सहकाऱ्यांची तातडीची बैठक बोलावली. आपल्याला राष्ट्रवादी सोडायचे आहे. शिवसेना की भाजपा असे दोन प्रस्ताव आपल्या पुढे आहेत. सेना-भाजपा युतीमध्ये कंधार हा मतदारसंघ शिवसेनेला सुटला होता. त्यामुळे शिवसेनेचा पर्याय सुरक्षित होता. 'दाजी-भावजी' थेट मातोश्रीवर जावून धडकले. पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांची भेट घेवून प्रतापरावांचा शिवसेनेत पक्ष प्रवेश निश्चित झाला. लोहा येथील बैल बाजाराच्या मैदानात प्रतापरावांनी शिवसेना पक्ष प्रवेश सोहळ्याची जय्यत तयारी केली होती. पक्षप्रवेश सोहळ्यास पक्षप्रमुख उध्दव ठाकरे स्वत: जातीने उपस्थित होते. या पक्षप्रवेश सोहळ्यास हजारो चिखलीकर प्रेमींनी मैदान खच्चाखच भरले होते. सभेला मार्गदर्शन करताना उध्दव ठाकरे म्हणाले, प्रतापरावांना मी नांदेड जिल्हापुरत ठेवणार नाही. त्यांना मराठवाड्याचं नेतृत्व करण्याची ताकद म्हणजे तुमच्या मनात असलेलं मंत्रीपद देण्याची जाहिर ग्वाही दिली होती. आपला नेता मंत्री होणार म्हणून कंधार-लोहा तालुक्यातील बहाद्दर जनतेने प्रतापरावांना प्रचंड मतांनी विजयी केले. पहिल्यांदा अपक्ष दुसऱ्यांदा शिवसेनेचा आमदार झाल्यानंतर प्रतापराव मातोश्री गाठली. मातोश्रीवर जाताना प्रतापरावांसोबत जीवाभावाचा मित्र लहान बंधू आ.हेमंत पाटील, शिवसेना जिल्हा प्रमुख प्रकाश कौडगे आणि पत्रकार प्रल्हाद उमाटे असे चार जण होते. मातोश्रीवर अनिल देसाई यांची भेट झाली. जिल्हा प्रमुख कौडगे यांनी प्रतापराव चिखलीकरांना मंत्री करण्याचे साकडं घातले. त्याचवेळी आ.हेमंत पाटील म्हणाले, प्रताप दादांना कॅबीनेट करा मला राज्यमंत्री करा अशी गुगली टाकली. देसाई साहेबांनी हेमंत पाटीलांना म्हणाले, तू आमदार झालास हेच खूप झालं अशी त्यांची मातोश्रीवर बोळवंण करण्यात आली. शिवसेनेत मंत्रीपदासाठी नांदेड जिल्ह्यात हेमंत पाटील, सुभाष साबणे आणि प्रतापराव पाटील चिखलीकर या तिघांत स्पर्धा सुरु झाली. शिवसेनेत आम्ही सिनिअर आहोत. प्रताप पाटील काल आले आणि आज त्यांना मंत्री पद हे काय बरोबर नाही असा वाद सुरु झाला. जिल्ह्यातील या तीन आमदारातील आपसातील भांडण न मिटल्यामुळे नांदेडचे मंत्रीपद हुकले. युतीच्या फडणवीस सरकारचे दोन आडीच वर्षानंतर मंत्रीमंडळाचा विस्तार होणार होता. या विस्तारात चिखलीकरांचा नंबर लागणार असे वाटत असतानाच प्रतापरावांचा 'राजकीय गेम' करण्यात आला. अशोकरावांनी मातोश्रीवर फिल्डींग लावली. प्रताप मंत्री होता कामा नये, कोणालाही करा पण त्याला मंत्री करु नका असे साकडं उध्दव ठाकरे यांना करुन नवैद्य पाठविले. नांदेडच्या चिखलीकरांचा पत्ता कट झाला नांदेडचे मंत्रीपद जालन्याच्या अर्जूनराव खोतकरांच्या पदरात पडले. चिखलीकरांची घोर निराशा झाली. मुख्यमंत्री असलेले देवेंद्र फडणवीस यांनी जनाधार असलेल्या चिखलीकरांसारख्या लोकनेत्याला आपल्या जाळ्यात घेरले. शिवसेनेचे आमदार असतानाही भाजपा पक्षसंघटना नांदेड जिल्ह्यात मजबूत करण्याची गुप्त जबाबदारी सोपविण्यात आली. भिवू नका, मी तुमच्या पाठिशी आहे. अशोकरावांशी टक्कर द्या, मी तुम्हाला बळ देतो असे आश्वासन दिले. नांदेड जिल्ह्याच्या राजकारणात प्रतापरावांना शिवसेना संपवून काँग्रेसचे अशोक चव्हाण यांच्याशी टक्कर द्यायची होती. नांदेड महानगर पालिकेच्या निवडणूकीत उघडपणे भाजपा प्रचाराची धुरा शिवसेनेचा आमदार असतानाही स्वत:च्या खांद्यावर घेतली. मनपा निवडणूकीत शिवसेना फोडली आणि भाजपाला पदाधिकारी जोडले. काँग्रेससोबत टक्कर देण्यासाठी निवडणूक मैदानात उतरले. एकहाती कारभार असलेल्या अशोकरावांनी अर्ध्या रात्रीतून 'खरेदी-विक्री'चा खेळ करुन मनपात नगरसेवकांचे प्रचंड संख्याबळ निवडून आणले आणि भाजपाचे पाणीपत केले हे विशेष!

मनपा निवडणूकीत काँग्रेसने फडणवीसांना मात देण्यात अशोकराव यशस्वी झाले. आगामी लोकसभेच्या निवडणूकीत भाजपाकडे सक्षम उमेदवाराची वणवा होती. सन २०१९ च्या काळात अशोकराव काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष होते. लोकसभेच्या निवडणूक रिंगणात चिखलीकरांना उतरवून अशोकरावांचे जिल्ह्यातच पाय बांधण्याचा प्रयोग भाजपाने केला. चिखलीकरांनी शिवसेना आमदारकीचा राजीनामा दिला. लोकसभेच्या निवडणूकीत उतरले. प्रारंभी अशोकरावांना हरवणे अशक्य वाटणारे वातावरण निवडणूकीच्या अंतिम टप्प्यात चिखलीकरांच्या बाजूने वादळ उठलं. लोकसभेच्या निवडणूकीत अशोकरावांचा दारुण पराभव झाला. महाराष्ट्राचा 'जायंट किलर' म्हणून दिल्लीदरबारी प्रतापरावांची ओळख झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भेटीसाठी विशेष निमंत्रण दिले. प्रतापरावांची पहिल्यांदा पंतप्रधान मोदी सोबत भेट झाली. त्यावेळी त्यांनी नांदेड-बिदर नव्या रेल्वे मार्गाचा रेंगात पडलेला प्रश्न सुटला पाहिजे अशी मागणी चिखलीकरांनी पंतप्रधानाकडे केली. पंतप्रधानांनी त्यांची मागणी पूर्ण करुन नांदेड-देगलूर-बिदर मार्गाला मंजूरी दिली हे विशेष!

राज्याचे दोन वेळचे मुख्यमंत्री, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्षपद भूषविलेल्या धनदांडग्या अशोकराव चव्हाणांचा पराभव करुन ऐतिहासिक विजय प्राप्त करणार्या चिखलीकरांचा केंद्रीय मंत्रीमंडळात नंबर लागणार ही नांदेडकरांची अपेक्षा दुसर्यांदा फोल ठरली. खासदारकीचा पाच वर्षाचा कार्यकाळ संपला. खा.चिखलीकर कांही मंत्री झाले नाही. नांदेड जिल्ह्यात भाजपाच्या पक्षसंघटनेची दयनीय अवस्थेतून चिखलीकरांच्या अथक परिश्रमाने बलवान अशी पक्ष संघटना झाली. भाजपातही 'चिखलीकर बोले, फडणवीस डोले' हा प्रयोग सुरु झाला. भाजपात सर्वत्र चिखलीकरांची चलती सुरु झाली. त्यामुळे पक्षातच चिखलीकरांच्या विरोधकांची संख्या वाढत गेली. लोकसभा निवडणूकीच्या तोंडावर चिखलीकरांचे कट्टर राजकीय विरोधक काँग्रेसचे नेते माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण हे अचानक भाजपात दाखल झाले. भाजपातही चिखलीकर-चव्हाण 'एक म्यान, दोन तलवार' प्रयोग झाला. खा.चिखलीकरांची खर्या अर्थाने राजकीय कोंडी झाली. लोकसभेच्या तिकीटासाठी चिखलीकरांना संघर्ष करण्याची वेळ आली. भाजपातील सर्व विरोधकांचे नेतृत्व अशोकराव करीत होते. शेवटच्या क्षणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस चिखलीकरांच्या मदतीला धावून आले आणि भाजपाची उमेदवारी जाहिर झाली. जवळ घेवून अशोकरावांनी चिखलीकरांचा राजकीय बदला घेतला. लोकसभेच्या निवडणूकीत चिखलीकर पराभूत झाले. काँग्रेसचे वसंतराव चव्हाण विजयी झाले. दोन चव्हाणांत छुपी युती होवून चिखलीकरांचा काटा काढला. काँग्रेसचे खा.वसंतराव चव्हाण यांचे अकाली निधन झाले. लोकसभेची पोटनिवडणूक लागली. भाजपा पक्षश्रेष्ठींनी पुन्हा चिखलीकरांना लोकसभेची निवडणूक लढविण्यास सांगितले त्यावेळी मात्र प्रतापरावांनी स्पष्ट शब्दात नकार देवून विधानसभेची निवडणूक लढविणार असल्याचे सांगितले. लोकसभेची पोटनिवडणूक लढविण्यास भाजपा पक्षश्रेष्ठींना नकार दिल्यामुळे चिखलीकरांचे पक्षातून 'कॉऊन डाऊन' सुरु झाले. विधानसभा निवडणुकीची उमेदवारी भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत महायुतीच्या जागा वाटपात कंधार-लोहा मतदारसंघा तिढा सुटला नाही. सन २००९ ची पुनरावृत्ती सन २०२४ च्या विधानसभेत झाली आणि कंधार हा मतदारसंघ पुन्हा राष्ट्रवादीला सोडण्यात आले. चिखलीकरांची राजकीय गोची झाली. भाजपाने केसाने गळा कापल्यासारखं चिखलीकरांना बाहेरचा रस्ता दाखविला. अजितदादाच्या राष्ट्रवादीकडून निवडणूक लढविण्याचे आदेश देवेंद्र फडणवीस यांनी दिले. अजितदादांनी चिखलीकरांना फोन करुन बोलावून घेतले. राष्ट्रवादीचा एबी फार्म देण्यापूर्वी राष्ट्रवादीत प्रवेश करुन घेतला.

निवडणूक काळात प्रचारासाठी अवघे १७ दिवस शिल्लक असताना प्रतापराव राष्ट्रवादीचे घड्याळ घेवून मतदारसंघात प्रचाराला निघाले. सर्व विरोधक एकत्र येवून चिखलीकरांच्या विरोधात एकीची मोठं बांधली. जाती-जातीच्या भिंती निवडणूक काळात उभ्या राहिल्या. मराठा समाजाचा विरोध, ओबीसीचे मतविभाजन, सर्व विरोधक एकत्र येवून शिवसेना उबाठाच्या एकनाथ पवाराला आर्थिक बळ देत चिखलीकरांसमोर आव्हान उभे केले. मतदारसंघातील चिखलीकरांचे नेतृत्व संपविण्याची नामी संधी विरोधकांना चालून आली होती. अभिमन्यू सारखा चक्रव्यूहात चिखलीकरांना अडकविण्याचे षडयंत्र रचविण्यात आले. राजकीय अस्तीत्वाच्या लढाईत विरोधकांनी रचविलेले 'चक्रव्युह' भेदण्यात चिखलीकर यशस्वी झाले. मन्याड खोर्यातील बहाद्दर मतदारांनी दोन दशकात निर्माण झालेल्या संघर्षमय नेतृत्वाला जीवदान देण्याचे मनोमनी ठाणले. ज्या गोरगरीबांची कामे चिखलीकरांनी केली. त्या ईमानदार मतदारांनी जाती भेदाच्या भिंती उध्वस्त करुन चिखलीकरांच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहिल्यामुळेच मन्याडचा वाघ पुन्हा जिल्हा नेतृत्वाची डरकाळी फोडू लागला. नवापुरत राष्ट्रवादीच जिल्ह्यात संघटऩ होतं. राष्ट्रवादीचा आमदार म्हणून निवडून आल्यानंतर चिखलीकरांनी अल्प कालावधीतच जिल्ह्यात राष्ट्रवादीची मोठी फौज पक्षाच्या पाठीशी उभी केली. जिल्ह्याच्या राजकारणात भाजपाला आव्हान देणारा पक्ष म्हणून राष्ट्रवादीची ताकद स्थानीक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीत निर्माण झाली आहे. राष्ट्रवादीची घोडदौड रोकण्यासाठी भाजपाचे नेते अशोकराव चव्हाण यांनी मनपाच्या निवडणूकीत शहर विकास आघाडीची स्थापना करुन दलित-मुस्लीम ओट बँक राष्ट्रवादीकडे झुकू नये यासाठी प्रयत्न करीत आहेत. अवघ्या पाच-सहा महिन्याच्या काळात राष्ट्रवादीत ज्येष्ठ नेते भास्करराव पाटील खतगांवकर यांच्यासह ओमप्रकाश पोकर्णा, अविनाश घाटे, मोहनराव हंबर्डे या चार माजी आमदारांना पक्षात घेतले. जि.प.चे माजी जिल्हाध्यक्ष वैशाली चव्हाण व शेषेराव चव्हाण यांचे अख्खे कुटूंब, जि.प.चे माजी सभापती व्यंकटराव पाटील गोजेगांवकर,नागनाथ घिसेवाड, शिवराज पाटील होटाळकर, बाळासाहेब पाटील रावणगांवकर, माधव पावडे, बंटी लांडगे यांच्यासह दलित,मुस्लीम,बहुजन समाजातील तरुण फळी राष्ट्रवादीशी जोडली गेली आहे. जिल्ह्यातील राष्ट्रवादी पक्ष प्रवेश सोहळ्यासाठी राष्ट्रीयनेते ना.अजितदादा पवार हे नांदेडला तीन वेळा येवून गेले. चौथ्या वेळेची तयारी सुरु झाली आहे. जिल्ह्यात राष्ट्रवादीची घोडदौड घडवून आणण्यात लोकप्रिय नेते आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा सिंहाचा वाटा असल्याचे जाहिररित्या दादांनी स्पष्ट केले. आगामी स्थानीक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीत जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला घवघवीत य्श मिळवून द्या, आ.चिखलीकर यांना मंत्री करण्याचे संकेत देताना मात्र त्यांनी पहिलं 'रिझल्ट द्या, मग मंत्रीपद घ्या' अशी अट टाकून आगामी काळात पक्ष संघटना वाढवून पक्षाला घवघवीत यश मिळवून देण्यासाठी 'अग्निपथ'वरुन खडतर राजकीय प्रवास करताना अनेक संघर्षाला प्रतापरावांना तोंड द्यावे लागणार आहे. प्रतापराव, मंत्रीपदाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी कितीही संकटे आले तरी मागे वळून पाहू नका, जिल्ह्यात पक्षाला उज्वल भवितव्य प्राप्त करुन द्या. राष्ट्रवादीचे दादांसारख्या खंबीर नेतृत्वाने तुम्हाला न्याय दिल्याशिवाय राहणार नाहीत. 'एकच वादा, अजितदादा' तुमचे अर्धवट राहिलेले मंत्रीपदाचे स्वप्न पूर्ण करतील अशी अपेक्षा बाळगू या, साहेब, तुम्हाला वाढदिवसाचे अभिष्टचिंतन!

## 'भुलभूलैय्या' कंधार 'पॅटर्न'

सन २००४ च्या विधानसभा निवडणूकीत चिखलीकरांनी अपक्ष उमेदवारी दाखल केली. विद्यमान आमदार रोहिदास चव्हाण, राष्ट्रवादीचे उमेदवार शंकरअण्णा धोंडगे, अपक्ष हरिहरराव भोसीकर आणि प्रतापरावही अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूकीच्या मैदानात उतरले. निवडणूक काळात प्रारंभी फार्मात असलेले भोसीकर यांची गाडी निवडणूकीच्या अंतिम टप्प्यात बंद पडली. चिखलीकरांनी भोसीकरांना 'मॅनेज' केल्याच्या अफवा सुरु झाल्या. निवडणूक प्रचारात तिसऱ्या क्रमांकावर असलेले प्रतापराव 'भावजी पॅटर्न'मुळे हनुमान उडी घेत पहिल्या क्रमांकावर येवून पोंहचले आणि अपक्ष आमदार म्हणून निवडून आले. विधानसभेच्या निवडणूकीत मतदारांना 'भुलभूलैय्या'चा पहिला प्रयोग कंधार मध्ये झाला. पुढे तो कंधार 'पॅटर्न' संपूर्ण राज्यातील विधानसभा निवडणूकीत जावून पोंहचला. तेंव्हापासूनच विधानसभेच्या निवडणूका 'कोट्याधीश'झाल्या हे विशेष!

# माजी मंत्री भास्करराव पाटील खतगावकर यांच्या पत्नी व माजी मुख्यमंत्री खा. चव्हाण यांच्या भगिनी स्नेहलता पाटील यांचे निधन

## आज नांदेड येथे अंत्यसंस्कार



**नांदेड (प्रतिनिधी)**– देशाचे माजी गृहमंत्री डॉ. शंकरराव चव्हाण व सौ. कुसुमताई चव्हाण यांच्या ज्येष्ठ कन्या, माजी मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण यांच्या भगिनी तथा माजी मंत्री भास्करराव पाटील खतगावकर यांच्या सुविद्य पत्नी सौ. स्नेहलता भास्करराव पाटील खतगावकर यांचे अल्पशा आजाराने शुक्रवारी येथील एका खाजगी रुग्णालयात निधन झाले. शनिवार, दि. २ रोजी सकाळी १० वाजता गोवर्धनघाट स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

सौ. स्नेहलता पाटील खतगावकर (वय ८० वर्षे) यांना काही दिवसांपूर्वी येथील एका खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. त्यांच्यावर उपचार सुरू असताना शुक्रवारी दुपारी त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. यात त्यांची प्राणज्योत मालवली.

सौ. स्नेहलता पाटील या अत्यंत धार्मिक वृत्तीच्या होत्या. श्री साईबाबा व श्री सत्यसाईबाबा यांच्या त्या निस्सीम भक्त होत्या. त्यांनी अनेक सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमामध्ये सहभाग घेतला होता.

सौ. स्नेहलता पाटील या नांदेड जिल्ह्याच्या राजकारणात सुध्दा सक्रिय होत्या. नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक म्हणून त्यांनी काही काळ काम पाहिले. माजी मंत्री भास्करराव पाटील खतगावकर व माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीत सहभाग घेवून त्यांनी प्रचाराची धुरा सांभाळली होती. सौ. स्नेहलता पाटील यांच्यावर उद्या शनिवार दि. २ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता राजेंद्रनगरमधील साईसदन या त्यांच्या निवासस्थानापासून अंत्ययात्रा निघणार आहे. त्यांच्यावर येथील गोवर्धनघाट स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

त्यांच्या पश्चात पती भास्करराव पाटील खतगावकर, बंधू माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, मुलगा निरंजन पाटील खतगावकर, स्नुषा डॉ. मीनल पाटील खतगावकर यांच्यासह चार बहिणी व मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाबद्दल जिल्ह्यातील अनेक मान्यवरांनी शोक व्यक्त केला आहे.

# नांदेड परिक्षेत्रात पोलिसांची मोहीम आणखी तीव्र; जुलैमध्ये २००० कारवाया, १२ कोटींचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड परिक्षेत्रात पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध धंद्याविरुद्ध पोलिसांची मोहीम तीव्र करण्यात आली आहे. या मोहिमेत २ हजार कारवाया, १२ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



परिक्षेत्रात सुरू असलेल्या अवैध दारू, मटका, जुगार, ऑनलाईन लॉटरी, क्रिकेट बेटिंग, गुटखा, अंमली पदार्थ, वेश्याव्यवसाय, वाळू उपसा व वाहतूक, अवैध प्रवासी वाहतूक इत्यादींना आळा घालण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी १ मे पासून नांदेड परिक्षेत्रात अवैध व्यवसाय विरोधी अभियान सुरु केले आहे.

पोलिसांनी नांदेड परिक्षेत्रात मे महिन्यात राबविलेल्या अवैध व्यवसायविरोधी अभियान -१ दरम्यान, अवैध व्यवसायांत गुंतलेल्या १७२१ इसमांचे विरुध्द एकूण १५६१ केसेस करुन ७,७९,४७,०४५/- रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला होता.

सदर कारवाईनंतर जून महिन्यात अवैध व्यवसाय विरोधी अभियान-२ सुरू करण्यात आले होते. यादरम्यान, अवैध व्यवसायांत गुंतलेल्या २५११ इसमांचे विरुद्ध एकूण २०३९ केसेस करून १२,३०,९५,२३४/- रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करून पोलिसांनी अवैध व्यवसायांचे विरोधात सुरू केलेली मोहीम आणखी तीव्र केली होती.

जुलै महिन्यात, परिक्षेत्रात अवैध व्यवसायविरोधी अभियान-३ राबविण्यात आले होते. या अभियाना दरम्यान, नांदेड परिक्षेत्रात अवैध व्यवसायिकांविरुध्द आणखी दोन हजारांहून अधिक केसेस करुन त्यांच्याकडून १२ कोटी रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

उपरोक्त कारवाई दरम्यान, स्थानिक गुन्हे शाखा लातूर व पोस्टे विवेकानंद चौक जि. लातूर यांनी पोस्टे विवेकानंद चौक हद्दीत ७,९९,९००/- रुपयांचे एमडी ड्रग्स जप्त करून चांगली कामगिरी केली आहे. सदर कामगिरी बाबत, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. आजवर राबविण्यात आलेल्या तीन अभियानांतर्गत, अवैध व्यवसायांत गुंतलेल्या (३८) इसमांना परभणी, लातूर व हिंगोली पोलिसांनी हद्दपार केले आहे. नांदेड पोलिसांनी हातभट्टी दारू व्यवसायाशी निगडित एका इसमास महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, अवैध धोकादायक व्यक्ती आणि अंमली पदार्थ विक्रेत्यांविरूध्द प्रतिबंधात्मक कारवाई अधिनियम १९८१ (MPD) कायद्याखाली एक वर्षासाठी स्थानबध्द केले आहे. दि. १७ जून २०२५ रोजी त्याची रवानगी छत्रपती संभाजीनगर कारागृहात करण्यात आली आहे. १ ऑगस्टपासून परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी अवैध व्यवसाय विरोधी अभियान - ४ राबविण्यात येत असून, संपूर्ण ऑगस्ट महिन्यात हे अभियान सुरु राहील. सदर मोहिमेदरम्यान गुटखा बंदीसाठी व्यापक वाहन व साठवणूक ठिकाणांच्या तपासणीची मोहीम हाती घेण्यात येणार आहे. अवैध व्यवसायांचे विरुध्द कारवाई करण्यासाठी नांदेड, परभणी, लातूर व हिंगोली या जिल्ह्यांत पोलीस अधीक्षक यांनी तयार केलेली विशेष पथके बंद करण्यात आली आहे

# पोलीस अधीक्षक कार्यालयात अण्णाभाऊ साठे जयंती साजरी



**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील पोलीस अधीक्षक कार्यालयात 'साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती शुक्रवार, दि. १ ऑगस्ट रोजी साजरी करण्यात आली.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी सपोनि रियाज शेख, पोलीस उपनिरीक्षक जे. ई. गायकवाड यांच्यासह पोलीस अधीक्षक कार्यालयातील सर्व विभागाचे पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदार यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे या महापुरूषांना अभिवादन केले.

कार्यक्रमाचे नियोजन पोउपनि सूर्यभान कागने, पोकॉ मारोती कांबळे व नरेंद्र राठोड यांनी केले होते.

# महसूल दिनाचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते उत्साहात उद्घाटन

नांदेड (प्रतिनिधी)– जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली तहसील कार्यालय नांदेड येथे १ ऑगस्ट रोजी महसूल दिन उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच १ ते ७ ऑगस्ट दरम्यान साजरा करण्यात येणाऱ्या महसूल सप्ताहाचे उद्घाटन जिल्हाधिकारी कर्डिले यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी तालुक्यातील सर्व ग्राम महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी, नायब तहसीलदार, महसूल सेवक कार्यालयातील सर्व महसूल सहाय्यक, सहाय्यक महसूल अधिकारी, पुरवठा विभागातील सर्व अधिकारी, कर्मचारी, स्वस्त धान्य दुकानदार तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



या कार्यक्रमांमध्ये जिल्हाधिकारी महोदय यांच्या हस्ते अल्पभूधारक प्रमाणपत्र, ई डब्ल्यू एस प्रमाणपत्र, मिळकत प्रमाणपत्र, रेसिडेंट प्रमाणपत्र याचे प्रातिनिधिक स्वरूपात वितरण करण्यात आले. तसेच एकूण २७ बिडी कामगारांना राशन कार्डचे वितरण करण्यात आले. शासनाच्या १०० दिवस प्रशासकीय सुधारणा अभियानांतर्गत नांदेड तहसीलचा प्रथम क्रमांक आल्याबद्दल माननीय जिल्हाधिकारी यांनी तहसीलदार संजय वारकड व उपविभागीय अधिकारी नांदेड डॉ. सचिन खल्लाळ यांचे विशेष अभिनंदन केले. सदर कार्यक्रमाप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करत असताना उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांनी सामाजिक भान जपत महसुली कामे करावी, असे प्रतिपादन केले व जिल्हाधिकारी नांदेड यांनी बदलत्या महसूल विभागाच्या कार्यपद्धतीविषयी व अधिकाधिक लोकाभिमुख व कार्यक्षम होण्याविषयी महत्त्वाचे मार्गदर्शन केले. महसूल कायदे नियम तसेच आधुनिक तंत्रज्ञान याबाबत प्रत्येक कर्मचाऱ्यांनी अपडेट राहावे असे जिल्हाधिकारी महोदयांनी याप्रसंगी नमूद केले. महसूल दिनानिमित्त जिल्हाधिकारी नांदेड यांनी सर्व कर्मचाऱ्यांना शुभेच्छा संदेश दिला. १ ऑगस्ट ते ७ ऑगस्टपर्यंत चालणाऱ्या महसूल सप्ताहाचे उद्घाटन जिल्हाधिकारी महोदय यांच्या हस्ते या कार्यक्रमात पार पडले.

# उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह योजना सुरू

**नांदेड (प्रतिनिधी)**– इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत राबविण्यात येत असलेल्या विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह योजना सुरू झाली आहे. वसतिगृहात प्रवेशित विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी भोजन निवास व शैक्षणिक साहित्यासाठी त्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यामध्ये थेट रक्कम वितरीत करण्यात येते.

जिल्ह्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या बी.ए./बी.कॉम/बी.एस.सी./एम.ए./एम.एस.सी. अशा बिगर व्यावसायिक प्रथम वर्षातील अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी सन २०२५-२६ वर्षांसाठी या योजनेचे अर्ज मागविण्यात आली आहेत. शासकीय वसतिगृह योजनेचे ऑनलाईन अर्ज https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर १७ ऑगस्ट २०२५ पर्यंत विहित वेबसाईटमध्ये भरावे, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याणचे सहाय्यक संचालक शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे.




**नांदेड**– नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव बोंढारकर यांच्या वाढदिवसानिमित्त येथील मातोश्री मंगल कार्यालयात ह.भ.प. रामराव महाराज ढोक नागपूरकर यांचा कीर्तन सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यास उपस्थित राहून आमदार बोंढारकर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देऊन अभिष्टचिंतन करताना आमदार हेमंत पाटील, आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, शिवसेना जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे, संपर्कप्रमुख दत्तात्रय पईतवार, शहरप्रमुख तुलजेश यादव यांच्यासह शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते नागरिक दिसत आहेत.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना जिल्हा ग्रंथालय कार्यालयात अभिवादन

**नांदेड (प्रतिनिधी)**– लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली. यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी अर्जुन झाडे यांच्या हस्ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन यावेळी करण्यात आले. त्याचे उद्घाटन जिल्हा नियोजन अधिकारी झाडे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी जिल्हा ग्रंथालय अधिकारी अनिल सूर्यवंशी यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन चरित्रावर मनोगत व्यक्त केले. जिल्हा नियोजन अधिकारी अर्जुन झाडे यांनी विद्यार्थ्यास मार्गदर्शन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिकेचे ग्रंथपाल श्रीनिवास इज्जपवाड यांनी मनोगत व्यक्त केले. कैलाशचंद्र गायकवाड, अजय वट्टमवार, उत्तम घोरपडे, निर्मलकुमार सूर्यवंशी, संजय पाटील, शिवाजी हंबिरे, रघु तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. शेवटी कैलाशचंद्र गायकवाड यांनी उपस्थितांचे व मान्यवरांचे आभार मानले.

# आ.प्रताप पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त आज कार्यक्रमांची रेलचेल

### विविध ठिकाणी सत्कार, रक्तदान, आरोग्य तपासणी, महाभिषेक, अभीष्टचिंतन आणि कविसंमेलनाचेही आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार तथा लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त शनिवार, दि. २ ऑगस्ट रोजी नांदेड शहर व जिल्हाभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



शनिवार, दि. २ ऑगस्ट रोजी सकाळी ७ वाजता माजी आमदार मोहनअण्णा हंबर्डे यांच्या पुढाकारातून काळेश्वर मंदिर येथे आरती व दर्शन. त्यानंतर हॉटेल गुरूब्रह्मा, ढवळे कॉर्नर, गुंडेगाव पाटील, ढाकणी, किवळा, लोंढेसांगवी, टेळकी फाटा, मोकलेवाडी, उस्माननगर, कलंबर, भोपाळवाडी, संगुचीवाडी, पांगरा, महादेव मंदिर मानसपुरी येथे भेटी व दर्शन, मानसपुरी चौक येथे शर्करातुला तर याचवेळी मानसपुरी ग्रामपंचायतीच्या वतीने भव्य सत्कारही करण्यात येणार आहे. कोटबाजार येथे सत्कार झाल्यानंतर कंधार येथील मोती दांत आ. चिखलीकर दर्शनासाठी जातील. सकाळी १०.१५ वाजता मारोती मंदिर चौक बाचोटी, त्यानंतर कंधार शहरातील गांधी चौक, राम मंदिर, साधू महाराज संस्थान, बौद्धविहार येथे सत्कार व अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. दरम्यान, ह.भ.प. संदीप महाराज आलेगावकर यांचा कीर्तन सोहळाही आयोजित करण्यात आला आहे. सकाळी १०.४५ वाजता आ. चिखलीकर कंधार शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करणार आहेत. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून ग्रामीण रुग्णालयात औषधी वाटपाच्या कार्यक्रमाला आमदार उपस्थित राहणार आहेत.

कंधार येथील न्यायालयासमोर स्वागत स्वीकारून ते महाराणा प्रताप, अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला अभिवादन करतील. त्यानंतर त्यांची शर्करातुला करण्यात येणार आहे. घोडज, लहुजी साळवे चौक, दिगंबर पाटील मंगल कार्यालय सिद्धार्थनगर, भवानीनगर, साईनगर, कंधार, विजयनगर कमान, निमगड, नंदिनी हॉटेल, दुर्गा हॉटेल येथे स्वागत स्वीकारल्यानंतर आ. चिखलीकर दुपारी १ वाजता लोहा तालुक्यातील किरोडा फाटा येथे उपस्थित राहतील. त्यानंतर धावरी फाटा, बेरळी फाटा, जिजामाता मंगल कार्यालय येथील कार्यक्रमांना ते उपस्थित राहणार आहेत. याच दरम्यान अहिल्यादेवी होळकर स्मारक, महात्मा बसवेश्वर पुतळ्यासही ते अभिवादन करणार आहेत. वाहनचालक संघटनेच्या वतीने जुना कोर्ट, लोहा येथे स्वागत समारंभ पार पडणार आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती लोहा, नगरपालिका लोहा, लोहा पोलीस स्टेशन, सराफा मार्केट, माजी नगराध्यक्ष कल्याणकर यांचे निवासस्थान येथेही सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे. आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त उद्या दि. २ ऑगस्ट रोजी नांदेड व लोहा-कंधार तालुक्यात तब्बल १०० ठिकाणी विविध कार्यक्रमांचेआयोजन करण्यात आले आहे. दुपारी ४.१५ वाजता शिवसेना संपर्क कार्यालयात स्वागत समारोह, त्यानंतर जय भवानी बेकरी, छत्रपती शिवाजी महाराज चौक येथेही स्वागत होईल. त्यानंतर आ. चिखलीकर लोहा चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करतील.

यावेळी पुतळा परिसरात विविध आठ ठिकाणी सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे. सायंकाळी ५.४५ वाजता पारडी येथे स्वागत, त्यानंतर कारेगाव, एमएच २६ वॉटर पार्क, आंबेसांगवी आणि सोनखेड येथे अभीष्टचिंतन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. सायंकाळी ६.३० वाजता माधव पावडे आयोजित कविसंमेलन आणि अभीष्टचिंतनाचा मुख्य सोहळा पार पडणार आहे.

# गिरजाबाई सावळे यांचे निधन



**बिलोली (प्रतिनिधी)**– तालुक्यातील ग्राम आदमपूर येथील कालवश माजी सैनिक सुभेदार नागनाथराव मोगलाजी सावळे यांच्या पत्नी ज्येष्ठ महिला गिरजाबाई नागनाथराव सावळे(८७)यांचे शुक्रवार, दि. १ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५:३० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर शनिवार, दि. २ ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजता आदमपूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. त्यांच्या पश्चात चार मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंड असा परिवार आहे.

नांदेड जिल्हा परिषदचे सहशिक्षक सुरज सावळे, हेमा सावळे, केशव सावळे, महायान सावळे यांच्या या आई होत.

# श्री हुजूर साहिब आयटीआयमध्ये विजय दिवस उत्साहात साजरा

## गौरवशाली इतिहासाची परंपरा कायम ठेवण्यांचा केला निर्धार

**नांदेड(प्रतिनिधी)** –देशाच्या सीमेवर बसलेले सैनिक नैसर्गिक संकटाचा सामना करत-करत देशांच्या शत्रूचा सामना करतात. हिवाळ्यात हाडे कंपण करणाच्या थंडीत जेव्हा तापमान शून्य ते वीस, पंचवीस सेल्सियस खाली जातो तरी तो सीमेवर पहारा देतो. देशवासीय शांत झोपावा म्हणून तो रात्र जागून काढतो. तप्त रेगिस्तानमध्ये धुळीच्या तुफानात तो उपाशीपोटी आपले कर्तव्य बजावतो. आवश्यकता पडली तर छातीवर शत्रूची गोळीही खातो. या शब्दात माजी सैनिक सरदार लछमन सिंघ रुड सिंघ फौजी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. श्री हजुर साहेब आय.टी.आय. नांदेड येथे कारगिल विजय दिवसानिमित्त कार्य-क्रमात ते बोलत होते.

श्रीलंकेत शांती अभियान राबवणाच्या भारतीय शांती सेनेत भाग घेतलेले जगिंदर सिंघ किशनसिंघ असर्जनवाले यांनी श्रीलंकेत त्याच्यावर ओढावलेल्या प्रसंगाचे कथन केले. त्यांचे थराथक प्रसंग ऐकून प्रशिक्षणार्थी थक्क झाले.

मंत्री ॲड. मंगल प्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विभागातर्फे कारगिल विजय दिवस साजरा करण्याच्या सूचनानुसार श्री हजूर साहेब आयटीआय नांदेड येथे कार्यक्रम साजरा करण्यात आला. या मागचा उद्देश स्पष्ट करीत गुरुद्वारा बोर्डचे कार्यकारी अधीक्षक प्राचार्य गुरुबचनसिंघ सिलेदार यांनी शेरे ए पंजाब महाराजा रणजीत सिंघजीच्या पराक्रमी कारकीर्दीचा उल्लेख करीत भारतीय इतिहास कसा गौरवशाली आहे याचे सुरेख वर्णन केले.

या कार्यक्रमात संस्थेतील मेकॅनिक मोटार वाहन व्यवसायाचे प्रशिक्षणार्थी पांडुरंग संजय कदम यांची भारतीय नौदलात मुख्य अधिकारी, चीफ ऑफिसर म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी देशाच्या सीमेचे रक्षण करणारे, शौर्य, वीरता, पराक्रम, अद्भूत साहस आणि बलिदानाचे प्रतीक भारतीय सेनेच्या या दोन पूर्व सैनिकांचा शाल, श्रीफळ देऊन संस्थेतर्फे सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गटनिदेशक भीमसिंघ बलथरवाले यांना केले. या कार्यक्रमास संस्थेचे गट निदेशक दर्शनसिंघ तबेलेवाले, गट निदेशक सरदार जगजीतपालसिंघ लोणीवाले, प्रकाशसिंघ मोहनसिंघ मान,जसप्रीतसिंघ हंजरा यांच्यासह सर्व निदेशक, कर्मचारी मोठ्या संख्येत प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# भारत-चीन संबंधांतील नाजूक सुधारणा

भारताने तब्बल पाच वर्षांनंतर चिनी पर्यटकांसाठी व्हीसा पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या महिन्यात चीनमध्ये होणाऱ्या शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशन संरक्षण परिषदेला पंतप्रधान नरेंद्र मोदी सहभागी होणार आहेत, त्याआधीचा हा निर्णय भारत-चीन संबंधांमध्ये नव्याने मोकळेपणाची सुरुवात मानला जात आहे. या पावलामागे दोन्ही देशांमध्ये पुन्हा प्रवास, पर्यटन आणि परस्परातील संबंधांमध्ये सुधारणा घडवून आणण्याचा उद्देश आहे. मात्र या निर्णयामागची पार्श्वभूमी विसरून चालणार नाही. २०२० मध्ये गलवान खोऱ्यात घडलेली चकमक, चीनची 'वन बेल्ट वन रोड' ही वर्चस्ववादी भूमिका आणि इंडो-पॅसिफिक भागातील वाढता हस्तक्षेप यामुळे भारत-चीन संबंधांमध्ये तीव्र तणाव निर्माण झाला होता. भारताने त्यानंतर चिनी गुंतवणुकीवर निर्बंध घातले, अनेक चिनी ॲप्स बंद केले आणि चिनी नागरिकांच्या व्हीसावर मर्यादा आणल्या. प्रत्युत्तरादाखल चीननेही भारतीय नागरिकांसाठी व्हीसा आणि थेट विमानसेवा बंद केल्या तसेच कैलास मानसरोवर यात्रेलाही परवानगी नाकारली. आता दोन्ही देशांनी संबंध सुधारण्याच्या दिशेने काही महत्त्वाची पावले उचलली आहेत. २०२४ मध्ये रशियात झालेल्या ब्रिक्स परिषदेत मोदी आणि शी जिनपिंग यांच्यात झालेल्या चर्चेनंतर ही प्रक्रिया सुरू झाली. त्यानंतर परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्या चीन दौऱ्याने ही चर्चा अधिक गंभीर झाली. याचे फलित म्हणजे कैलास मानसरोवर यात्रा पुन्हा सुरू झाली, थेट विमानसेवा पुन्हा कार्यरत झाली आणि व्हीसा प्रक्रिया पुन्हा सुरू करण्यात आली. याव्यतिरिक्त, आर्थिक आणि व्यापार विषयांवर संवाद सुरू करण्यासाठी दोन्ही देशांनी कार्यरत बैठकांचे आयोजन करण्याचे ठरवले आहे. सध्याच्या निर्बंधांमुळे दोन्ही देशांच्या पुरवठा साखळीवर मोठा परिणाम झाला आहे भारताने चिनी गुंतवणुकीवर मर्यादा घातल्या आहेत, तर चीनने खतांवर आणि काही महत्त्वाच्या खनिजांवर निर्यातबंदी केली आहे. २३ जुलै रोजी झालेल्या भारत-चीन वर्किंग मेकॅनिझमच्या ३४ व्या बैठकीत सीमावर्ती भागात शांती राखण्यावर भर देण्यात आला. हे सूचित करते की दोन्ही देश नव्या जागतिक राजकारण आणि व्यापारयुद्धाच्या पार्श्वभूमीवर संबंध नव्याने परिभाषित करण्याच्या प्रयत्नात आहेत. पण या संवादामागील उद्देश आणि त्याचे संभाव्य परिणाम तपशीलवार समजून घेणे आवश्यक आहे. भारतासाठी आपल्या सीमा सुरक्षित ठेवणे आणि चीनसोबत स्थिर संबंध राखणे ही परराष्ट्र धोरणातील प्राथमिकता आहे. परंतु अमेरिकेच्या ट्रम्प प्रशासनाने अलीकडे घेतलेल्या परराष्ट्र धोरणातील भूमिकेमुळे भारताची अमेरिका-निर्भर रणनीती काहीशी अस्थिर झाली आहे. विशेषतः भारत-पाकिस्तान संघर्षादरम्यान ट्रम्प यांच्या वक्तव्यांमुळे भारतात अमेरिकेवरील विश्वास डळमळीत झाला आहे. यामुळेच भारतासाठी चीनसोबत संबंध सुधारणे हा एक व्यावहारिक तोल साधण्याचा प्रयत्न वाटू शकतो. परंतु यामध्येही काही 'रेड लाईन्स' आहेत, ज्या ओलांडल्या जाऊ शकत नाहीत. चीनचे पाकिस्तानसोबतचे लष्करी सहकार्य भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी दीर्घकालीन धोका ठरू शकते. शिवाय, चीनने सीमेवर सुरू केलेल्या आक्रमक पायाभूत सुविधांची उभारणी आणि तिबेटमध्ये ब्रह्मपुत्रा (यारलुंग त्संगपो) नदीवर उभारण्यात येत असलेल्या भव्य धरण प्रकल्पाने भारताच्या पाणी स्रोतांबाबत चिंतेची नांदी केली आहे. या साऱ्या पार्श्वभूमीत एक महत्त्वाचा मुद्दा अधोरेखित करणे आवश्यक आहे की द्विपक्षीय संबंधांमध्ये नवा विश्वास निर्माण करण्यासाठी फक्त सौजन्यपूर्ण पावले पुरेशी नाहीत. ज्या गंभीर मुद्द्यांनी दोन्ही देशांमधील दुरावा वाढवला, त्यांना जाणीवपूर्वक दुर्लक्षित करणे म्हणजे संबंधांचा पाया कमकुवत ठेवण्यासारखे आहे. कोणताही संवाद जर पारदर्शकतेच्या अभावात आणि अस्थिर संकल्पनांवर आधारित असेल, तर त्यातून निर्माण होणारा विश्वास अल्पकालीन ठरतो. चीन आणि पाकिस्तान हे जगातील अत्यंत अविश्वासू, धोकादायक आणि लांडग्याच्या वृत्तीचे देश आहेत हे माहीत असूनही आज चीनशी संबंध सुधारणे ही भारतासाठी गरजेची गोष्ट झाली आहे. त्यासाठी मूल्यांवर आधारित स्पष्ट धोरणाची आवश्यकता आहे. भारताने केवळ व्यापार आणि थेट संवादाच्या आधारे संबंध सुधारण्याच्या दृष्टीने न पाहता, सुरक्षा, जलस्रोत आणि सीमावाद यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर कठोर पण रचनात्मक भूमिका घेणे गरजेचे आहे. एकंदरीत, भारत-चीन संबंधांतील सुधारणा हे स्वागतार्ह पाऊल असले तरी ते टिकवायचे असल्यास पारदर्शकता, परस्पर सन्मान आणि कठोर वास्तववादाची जोड दिली गेली पाहिजे. अन्यथा, हा नवा अध्यायही जुन्याच विसंवादांनी भरकटण्याचा धोका कायम राहील.

# पप्पा, तुमचं नेतृत्त्व संयमी व दिलदार!



मन्याड खोऱ्यातील शेतकरी कुटुंबातील सर्वसामान्य घराण्यातून अत्यंत कष्टाने आणि संघर्षमय जीवनातून उदयास आलेले स्वकृत्ववाने, लोकप्रियतेने आणि जनसामान्यांच्या कामातून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचलेले नेतृत्व म्हणजे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर हे माझे वडील असल्याचा मला सार्थ अभिमान आहे.

माझे पप्पा आ. प्रतापराव पाटील चिखलीकर हे शांत, संयमी आणि दिलदार आहेत याची प्रचिती माझ्यासह जनतेलाही येत आहे. त्यांची ही प्रतिमा लोकांमधून तयार झाली आहे. लोकसमन्वयाचे ते उत्तम उदाहरण आहेत. राजकारणात यशस्वी होण्यासाठी केवळ आक्रमकता किंवा लोकप्रियता पुरेशी नसते; परिस्थितीचा अचूक अंदाज, लोकांच्या समस्या समजून घेण्याची संवेदनशीलता आणि त्यावर प्रभावी उपाययोजना करण्याची क्षमता आवश्यक असते. पप्पांनी याच गुणांचा सुंदर मेळ साधत नांदेडच्या राजकारणात आपले स्थान अढळ केले. त्यांच्या यशाचे मूळ जनतेशी असलेल्या थेट आणि प्रामाणिक संवादात दडले आहे. सामान्य माणसाच्या हृदयातील नेते म्हणून त्यांची ओळख आहे.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी नांदेडच्या काँग्रेसच्या गडाला खिंडार पाडून विजय संपादन केला. हा विजय त्यांच्या जनसंपर्काच्या सामर्थ्याचा आणि लोकांशी असलेल्या विश्वासाचा परिपाक होता. नांदेडसारख्या काँग्रेसच्या बालेकिल्ल्यात भाजपचा झेंडा फडकवणे हे त्यांच्या रणनीती आणि संयमाचे प्रतीक आहे.

राजकारणात राजकीय वैमनस्य सहसा अपरिहार्य मानले जाते, पण चिखलीकर साहेबांनी आपल्या संयमी स्वभावाने आणि समन्वयाच्या कौशल्याने या आव्हानांवर मात केली. २०२४ मध्ये अशोक चव्हाण यांनी भाजपात प्रवेश केल्यानंतर पप्पांनी पूर्वीचे राजकीय वैर विसरून त्यांच्यासोबत एकत्रितपणे काम करण्याची तयारी दाखवली. या दोन दिग्गज नेत्यांचे एकत्र येणे नांदेडच्या राजकारणात नव्या समीकरणांचा पाया ठरला. पप्पांनी पक्षांतर्गत आणि बाहेरील नेत्यांशी सुसंवाद राखत आपल्या समन्वयशील नेतृत्वाची चुणूक दाखवली.

स्थानिक समस्यांवर त्यांचे नेहमीच विशेष लक्ष राहिले आहे. लोहा-कंधार आणि नांदेडमधील शेतकरी, मजूर आणि सामान्य जनतेच्या गरजा समजून त्यांनी विकासकामांना गती दिली. खासदार म्हणून त्यांनी रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण आणि आरोग्य सुविधांवर भर देत अनेक प्रकल्पांना चालना दिली. यामुळे त्यांना 'खंबीर नेतृत्व' म्हणून जनतेचा विश्वास आणि आदर मिळाला.

अर्थात, कोणत्याही राजकीय नेत्याप्रमाणे पप्पांनाही आव्हानांचा सामना करावा लागला. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या वसंतराव चव्हाण यांच्याकडून त्यांचा पराभव झाला. मात्र, या पराभवाला त्यांनी सकारात्मक दृष्टिकोनातून सामोरे जाऊन आपल्या संयमाची आणि राजकीय प्रगल्भतेची प्रचिती दिली. आपल्या पराभवाची कारणे स्पष्ट करताना त्यांनी इतरांवर दोषारोप न करता पक्षाच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला आणि पुढील आव्हानांसाठी तयारी सुरू केली. गेल्या दोन दशकांत त्यांनी पाच वेळा पक्ष बदलले, ज्यामुळे काहींनी त्यांच्या निष्ठेवर प्रश्न उपस्थित केले. पण प्रत्येक पक्षात त्यांनी आपल्या कार्यक्षमतेने आणि जनतेशी असलेल्या नात्याने टीकाकारांना सडेतोड उत्तर दिले.

पप्पांच्या लोकप्रियतेचे रहस्य त्यांच्या साध्या, प्रामाणिक आणि जनसेवेला वाहिलेल्या स्वभावात आहे. ते नेहमीच जनतेच्या मधोमध राहिले, त्यांच्या समस्यांना आपल्या समस्यांसारखे समजून त्यावर उपाय शोधले. नांदेडच्या राजकारणात त्यांचे योगदान अविस्मरणीय आहे. त्यांनी केवळ २०१९ मध्ये काँग्रेसचा पराभव करून भाजपची ताकद वाढवली नाही, तर स्थानिक स्वराज्य संस्थांपासून लोकसभेपर्यंतच्या कारकीर्दीत विकासकामांना गती दिली. लोहा-कंधार मतदारसंघात त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक विकास प्रकल्प राबवले गेले, ज्यामुळे तेथील जनतेच्या जीवनमानात लक्षणीय सुधारणा झाली.

पप्पांचे नेतृत्व हे संयम, समजूतदारपणा आणि जनसेवेचा आदर्श आहे. राजकारणात यशस्वी होण्यासाठी आक्रमकता आणि लोकप्रियतेसोबतच संयम आणि रणनीती यांचीही गरज असते, हे त्यांनी आपल्या कारकीर्दीतून वेळोवेळी सिद्ध केले. त्यांचा हा प्रवास तरुण नेत्यांसाठी प्रेरणादायी आहे; जो संयम, समर्पण आणि लोककल्याणाच्या महत्त्वावर प्रकाश टाकतो. आजही ते लोहा-कंधार मतदारसंघात जनसेवेचा वसा पुढे नेत आहेत. त्यांचा हा वारसा आमच्यासाठी पथदर्शी आहे.

भारतीय जनता पक्षात असताना देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी, देशाचे गृहमंत्री अमित शहा, राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुसऱ्यांदा तुम्हाला लोकसभेची उमेदवारी दिली. मागच्या पाच वर्षांच्या काळात तुम्ही पक्ष वाढविण्यासाठी घेतलेले कष्ट आणि लोकांची कामे करण्यासाठी घेतलेली मेहनत त्यांच्या समोर होती.

दुर्दैवाने मतदार विरोधकांच्या खोट्या अपप्रचाराला बळी पडले. यामुळे तुमचा पराभव झाला. पप्पा, तुमच्या राजकीय जीवनाचा संघर्ष संपला नाही हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले. या कठीण काळात तुम्ही कधीही नकारात्मक विचार केला नाही ना कोणाला दोष दिला. निकालाच्या दुसऱ्या दिवशीपासून तुम्ही जनतेच्या सेवेत दाखल ते क्षण माझ्यासह प्रत्येक कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी होते. ज्या मतदारांनी मोठ्या विश्वासाने कठीण काळामध्ये साथ दिली त्या मतदार बांधवांचे ऋण व्यक्त करण्यासाठी लोकसभा क्षेत्रातील प्रत्येक तालुक्यातील कार्यकर्त्यांमध्ये जाऊन आपण मतदार बंधू-भगिनींचे ऋणानुबंध व्यक्त केले. झाले गेले विसरून जा नव्या उमेदीने येणाऱ्या काळातील निवडणुकांसाठी सज्ज रहा असा सकारात्मक संदेश दिला.

काही महिन्यांनंतर विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले. लोहा, कंधार तालुक्यातील सर्वसामान्य जनता हे मोठ्या हिंमतीने आणि अत्यंत प्रामाणिकपणे तुम्हाला सांगत होते..साहेब काहीही झालं तरी येणारी विधानसभेची निवडणूक लोहा कंधारमधूनच लढवा असा आग्रह करत होते.याच अनुषंगाने आपण लोहा कंधार मतदारसंघातील सर्व समाज घटकातील प्रमुख व्यक्तींच्या बैठका घेत होतात.त्या क्षणांची मी स्वतः साक्षीदार आहे. भाजपा पक्षश्रेष्ठींचा आग्रह होता की तुम्ही पुन्हा नांदेड लोकसभेची पोटनिवडणूक लढवावी मात्र तुम्ही लोहा कंधारमधील जनतेच्या आग्रहाखातर लोहा-कंधार विधानसभेची निवडणूक लढवण्यासाठी आग्रही होतात. लोकसभेचा दुर्दैवी झालेला पराभव विसरून तुम्ही अत्यंत जोमाने आम्हा सर्व कार्यकर्त्यांना घेऊन लोहा कंधार विधानसभेची निवडणूक जिंकण्याच्या उद्देशाने सर्व बांधणी करत होतात, परंतु नियतीला काही औरच मान्य होत... सायंकाळी दिल्लीवरून फोन आला. देवेंद्र फडणवीस यांच्या मान्यतेने अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून विधानसभा निवडणूक लढवण्याची आपणास सूचना केली गेली. हा क्षण माझ्यासह हजारो कार्यकर्ते पाहत होते. हा पक्षश्रेष्ठींचा निर्णय अत्यंत शांतपणे, संयमाने मान्य करून विधानसभेला तुम्ही सामोरे गेलात.

पप्पा, एक लाडकी मुलगी म्हणून तुम्ही माझ्यावर नेहमी जीव ओवाळून टाकता. मागच्या अकरा वर्षांपासून मी एक सहकारी म्हणून सामाजिक राजकीय जीवनात तुमच्या मार्गदर्शनाखाली काम करीत आहे. पप्पा, तुम्ही सतत १४ - १५ तास जनसेवेत असता. नेहमी जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन सतत जनतेच्या कामात असता. कार्यकर्त्यांच्या गराड्यात असणारे लोकनेते म्हणून तुमची जिल्हाभर ख्याती आहे. इतका प्रचंड कामाचा व्याप असूनही पप्पा तुम्ही कधी थकलेले वाटत नाहीत. कधी जाणीवपूर्वक विश्रांती घेतली नाही.

'हे कंकण करी बांधियले,
जनसेवे जीवन दिधले' या ओळींप्रमाणे तुम्ही राजकीय, सामाजिक आयुष्य लोकसेवेसाठी समर्पित केले आहे. तुम्ही शांत संयमी आहात. तुम्ही आणि जनसेवा या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहात. 'जनता माझी मी जनतेचा' हे ब्रिद घेऊन साहेब मागच्या ३ दशकांपासून जनतेच्या कल्याणासाठी लढत आहात. याचा मी रोज तुमच्या सोबत असताना अनुभव घेत असते. जनतेच्या आणि परिवाराच्या सुख, दुःखात कितीही संकटे आली तरी एखाद्या वटवृक्षप्रमाणे तुम्ही अत्यंत धीर-गंभीरपणे ठामपणे पाठीशी खंबीर असता, पाठीराखा म्हणून तुम्ही उभे राहता. म्हणूनच इथल्या जनतेने तुम्हाला तळहाताच्या फोडाप्रमाणे जपले आहे. अशा माझ्या प्रिय पप्पांना मी जन्मदिवसानिमित्त दीर्घायुरारोग्य लाभावं, अशी सदिच्छा देते.

**-सौ. प्रणितातार्ई देवरे-चिखलीकर**
भाजपा महिला मोर्चा
प्रदेश उपाध्यक्षा महाराष्ट्र

# सर्वसामान्यांचे नेतृत्व आ. प्रतापराव पाटील चिखलीकर



आजकालच्या बदलत्या राजकीय व्यवस्थेमध्ये लोकांशी थेट संवाद साधणारे, त्यांच्या अडचणी समजून घेणारे आणि विकासाचा ठोस आराखडा उभा करणारे नेते फार थोडे आहेत. या विरळ होत चाललेल्या संख्येत जे नाव आदराने घेतले जाते, ते म्हणजे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर. त्यांच्या जन्मदिवसानिमित्त आज त्यांचा राजकीय, सामाजिक आणि व्यक्तिगत प्रवास उलगडून पाहणे ही एक प्रेरणादायी गोष्ट ठरेल.

प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा जन्म एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. बालपणापासूनच त्यांच्यात सामाजिक बांधिलकी, नेतृत्वगुण आणि जाणीवशीलता होती. शिक्षण घेत असतानाच त्यांनी समाजकार्यात सक्रिय सहभाग घेण्यास सुरुवात केली. त्यांच्या अभ्यासू, निग्रही आणि ठाम स्वभावामुळे त्यांनी अल्पावधीतच स्थानिक राजकारणात आपले स्थान निर्माण केले. ग्रामपंचायत ते लोकसभा असा यशस्वी राजकारणाचा पल्ला त्यांनी गाठला. या प्रवासात त्यांना अनेकवेळा संघर्ष करावा लागला. पण खचले नाहीत. थांबले नाहीत. कुणाचा द्वेष केला नाही. वडील शांतीदूत गोविंदराव पाटील चिखलीकर यांचा समाजसेवेचा वसा घेऊन लोककल्याणासाठी निघालेल्या चिखलीकर यांचा जीवलगांचा गोतावळा प्रचंड जमला आहे. प्रत्येकाच्या सुख-दुःखात सहभागी होणारे साहेब हे खरे लोकसेवक आहेत. त्यामुळे जनता त्यांच्या पाठीशी कायम राहिली आहे.

राजकारण हे केवळ निवडणुकांचे माध्यम नसून, ते जनतेच्या समस्या जाणून त्यावर उपाय शोधण्याचा प्रयत्न असतो, हे त्यांनी सुरुवातीपासूनच समजून घेतले होते. याच न्यायाने ते काम करतात. आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे जनतेशी त्यांचे असलेले थेट, प्रामाणिक आणि हृदयस्पर्शी नातं. त्यांनी कधीही राजकारणाला केवळ सत्तेच्या दृष्टिकोनातून पाहिले नाही. त्यांच्या प्रत्येक भेटीत, दौऱ्यात किंवा भाषणात एक गोष्ट स्पष्ट दिसते ते माणसाला केंद्रस्थानी ठेवून निर्णय घेतात. जनता माझी मी जनतेचा हा त्यांना आपुलकीचा गोडवा प्रत्येकाला आपला करीत असतो.

आ. चिखलीकर हे नेहमीच जमिनीवर उतरून काम करणारे नेता म्हणून ओळखले जातात. गावागावांतील अडचणी, शेतकऱ्यांचे प्रश्न, युवकांच्या संधी, महिलांची सुरक्षा हे सारे मुद्दे त्यांच्यासाठी फक्त घोषणांचे विषय नसतात, तर ते त्यांच्या कृतीचा भाग असतात.

आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी विकासाचा आराखडा आखताना केवळ शहरी भागांपुरता मर्यादित राहिलेलं नाही. ग्रामीण भागातील रस्ते, वीज, पाणी, आरोग्य केंद्रे, शिक्षण संस्था यांसारख्या मूलभूत गरजांवर त्यांनी विशेष लक्ष केंद्रित केले. कंधार-लोहा विधानसभा मतदार संघाला सिंचनाखाली आणण्यासाठी लिंबोटी धरणाची निर्मिती त्यांनी केली. आमदारकीच्या एकच कालावधीत धरण उभारण्याची किमया साधणारे ते एकमेव आमदार ठरले आहेत. शेतकरी सुखी झाला पाहिजे ही त्यांची धारणा राहिली आहे. जोपर्यंत शेतकऱ्यांना कृषी सिंचनासाठी मुबलक पाणी मिळत नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने शेतकरी संपन्न होणार नाही या जाणिवेतून या भूमिपुत्राने आणि शेतकरी पुत्र आणि लिंबोटी सारखे धरण उभारून हजारो शेतकऱ्यांना सुखाचा मार्ग दाखवला आहे.

कोरोना महामारी, पावसाचे अतिवृष्टीसारखे संकट किंवा इतर सामाजिक आपत्ती अशा प्रत्येक वेळेस चिखलीकर हे स्वतः पुढे येऊन संकटाचे व्यवस्थापन करताना दिसले. त्यांनी स्वतःच्या कार्यकर्त्यांना आणि प्रशासनाला सोबत घेऊन संवेदनशीलतेने आणि गतिशीलतेने कार्य केले. संकटांना सामोरे जाताना त्यांनी लोकांमध्ये धीर निर्माण केला आणि मदतीचा हात पुढे केला. त्यामुळे त्यांच्या कार्याची दखल केवळ मतदारसंघापुरतीच मर्यादित न राहता, राज्यपातळीवरसुद्धा घेतली गेली. प्रत्येक व्यक्तीला आपल्या कुटुंबातील सदस्य समजून त्याच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी धावून येणारे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर हे जिल्ह्यातील एकमेव नेते ठरतात. लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघ म्हणजे माझे कुटुंब आणि या कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती माझ्या कुटुंबातील सदस्य ही आत्मीय भावना जपणारे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर हे खऱ्या अर्थाने आपल्या हक्काचा माणूस ठरतात.

राजकारणासोबतच आ. प्रतापराव पाटील चिखलीकर हे शैक्षणिक संस्था, क्रीडा संघटना आणि सामाजिक सेवाभावी उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतात. सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी आणि नवयुवकांना त्यांच्या मुळांशी जोडण्यासाठी त्यांनी अनेक उपक्रमांना चालना दिली आहे. त्यांनी उभारलेल्या संस्थांमधून शेकडो विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळाली आहे, आणि अनेक गरजू कुटुंबांना आरोग्य, आर्थिक मदत व सामाजिक सुरक्षा मिळवून देण्यात आली आहे.

नेतृत्वात यशस्वी होण्यासाठी केवळ धोरणे पुरेशी नसतात, तर स्वतःच्या चारित्र्याची आणि मूल्यांची मोठी भूमिका असते. आ. चिखलीकर हे स्वच्छ प्रतिमा, नम्र स्वभाव, आणि प्रामाणिक विचार यामुळे एक आदर्श नेता म्हणून समाजात प्रसिद्ध आहेत. त्यांनी आपली राजकीय कारकीर्द ही सत्य, सेवा आणि समर्पण यांच्यावर उभी केली आहे. त्यामुळे त्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये आणि समर्थकांमध्ये त्यांच्याबद्दल आदराची भावना निर्माण झाली आहे. खासदार म्हणूनही त्यांनी नांदेड लोकसभा मतदारसंघाला विकासाच्या केंद्रस्थानी ठेवले होते. नांदेड जिल्ह्यातील अनेक महत्त्वाचे प्रश्न, रेल्वेचे प्रश्न त्यांनी मार्गी लावले. लोककल्याण आणि जनविकास हाच त्यांचा ध्यास राहिला आहे. गोरगरिबांपासून ते श्रीमंतांपर्यंत प्रत्येकाच्या सुख-दुःखात सहभागी होणाऱ्या या नेतृत्वाचा आज वाढदिवस. अशा प्रेरणादायी नेतृत्वाचा वाढदिवस साजरा करताना, त्यांच्या कार्यात भरभराट व्हावी, त्यांना उत्तम आरोग्य लाभावे आणि त्यांच्या माध्यमातून आपल्या समाजाला, भागाला, राज्याला विकासाचे नवे वळण लाभो, हीच मन:पूर्वक शुभेच्छा!

**मारोती जाधव**
स्वीय सहाय्यक

# जनता शिक्षण मंडळाचे संस्थापक कै. नागोराव जाधव

जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष, ग्रामीण व बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून शिक्षणाचा दीपस्तंभ सर्वांसाठी उभा करणारे शिक्षणमहर्षी तथा क्रांतिकारी चळवळीचे प्रणेते कै. नागोराव जाधव यांचा आज स्मृतीदिन. त्यानिमित्त 'लेख'.

शिक्षणाची गंगा तळागळातील लोकांच्या दारात पोहचावी म्हणून मोजक्याच मान्यवरांनी तळमळीने प्रयत्न केले. बोटावर मोजण्याइतक्या मंडळीत जनता शिक्षण प्रसारक मंडळ उमरदरी ता. मुखेडचे संस्थापक अध्यक्ष शिक्षण महर्षी कै. नागोराव जाधव यांचा क्रमांक लागतो. शिक्षण महर्षी नागोराव जाधव यांचा जन्म १२ डिसेंबर १९३४ रोजी उमरदरी या गावात एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. १९३४ म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळ होता व त्यावेळी मराठवाड्यावर निजाम शाहीचा एकछत्री अंमल होता.

पूर्व प्राथमिक शिक्षणासाठी त्यांच्या वडिलांनी त्यांना मुखेड येथे गोविंद मास्तर (गुरुजी) यांच्या खाजगी शाळेत दाखल केले. त्याकाळी अनिवार्य असलेलील उर्दू भाषा त्यांना उत्तमरित्या अवगत होती. त्यांचे हायस्कूलचे शिक्षण



देगलूर येथील साधना हायस्कूल येथे पूर्ण झाले. १९५२ साली ते मॅट्रीक उत्तीर्ण झाले. १९४९ ते १९५१ च्या दरम्यान आर्य वसतिगृह देगलूर, १९५१ ते १९५२ मराठा वसतिगृह नांदेड व १९५२ ते १९६५ च्या दरम्यान पीपल्स कॉलेजच्या वसतिगृहात राहून त्यांनी बी.ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. १९५६ साली इंग्रजी व इतिहास विषयाची आवड असल्यामुळे इंग्रजी वाङ्.मय (इंग्लिश लिट्रेचर) घेऊन पीपल्स महाविद्यालयातून बी. ए.ची पदवी प्राप्त केली. इंग्रजी वाङ्.मयाचा एक जिज्ञासू विद्यार्थी म्हणून सर्व प्राध्यापक वर्गाचे त्यांच्याकडे विशेष लक्ष असायचे. विद्यार्थी जीवनापासून कोणत्याही विषयावर असलेल्या वक्तृत्व स्पर्धेत ते हिरीरीने भाग घेत असत. स्वतःच्या शैलीदार व आवेशपूर्ण वक्तृत्व गुणांमुळे ते सर्वपरिचित झाले व यातून त्यांच्या व्यक्तीमत्वाची जडणघडण होत गेली.

१९५७-५८ साली शासकीय बी. एड. कॉलेज औरंगाबाद येथून त्यांनी बी. एड.ची पदवी प्राप्त केली. बी. ए., बी. एड. झाल्यानंतर शाळा व वसतिगृहे सुरू करावीत असा विचार त्यांच्या मनात होता, पण आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्यामुळे दोन वर्षात तीन ठिकाणी म्हणजेच १९५४ ते १९५९ च्या दरम्यान शारदा भवन हायस्कूल नांदेड येथे इंग्रजी विषयाचे शिक्षक म्हणून व त्यानंतर जनता हायस्कूल, नायगाव बाजार या शाळेचे पहिले मुख्याधापक म्हणून व मिलिंद विद्यालय कुंडलवाडी या शाळेत मुख्याध्यापक म्हणून इतरांकडे नोकरी केली, पण नोकरी करताना केवळ आपलाच उद्धार होईल, आपले एकट्याचे कुटुंब तेवढे सुखी होईल, पण इतरांचे काय? या भावनेने व आपल्या सभोवतालच्या खेड्यातील अज्ञानी व गरीब असलेल्या लोकांना शिक्षण देण्यासाठी १९५९ मध्ये मुखेड तालुक्यातील उमरदरी येथे जनता शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना करून जून १९६० मध्ये उमरदरी येथे नरसिंह विद्यामंदिर सुरु केले.

त्याकाळी विद्यार्थ्यांना अतिशय दुरदुरून चालत यावे लागत असे. त्यांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन शिक्षण घेण्याची आणि राहण्याची सोय एकाच ठिकाणी व्हावी या उद्देशाने त्यांनी दुसऱ्याच वर्षी कॉस्मॉपोलेटीन हॉस्टेलची सुरुवात केली.

तसेच १९६९ साली मुखेड तालुक्यातील चांडोळा सर्कलमधून जि. प. निवडणुक लढवून सदस्य म्हणून ते निवडून आले.नांदेड जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीचे ते काही काळ सदस्य सुद्धा होते. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सेक्रेटरी म्हणून सुद्धा त्यांनी काही काळ कार्य केले. त्यांनी 'आघात' नावाचे मराठी साप्ताहिक सुरु केले. भ्रष्टाचार विरोधी घणाघाती लेखही त्यांनी लिहिले.

पुढे राजकारणात ते फारसे रमले नाहीत, पण शैक्षणिक चळवळीपासून मात्र ते दूर गेले नव्हते. मात्र कालांतराने ते राजकीय क्षेत्र सोडून पुन्हा शिक्षण क्षेत्रातच त्यांनी झेप घेतली.

कार्ल मार्क्स, लेनिन, एंगेल्स, शेक्सपियर, महात्मा फुले, छत्रपती शाहु महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, संत गाडगे महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्वज्ञानाचा व विचारांचा त्यांच्यावर मोठा पगडा होता.

शेतकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याकरिता व न्याय्य मागण्यांकरिता अनेक लोकचळवळी त्यांनी उभ्या केल्या. त्यांनी कोणत्याही राजकीय पुढाऱ्याची उभ्या आयुष्यात कधीही हांजी-हांजी व लाचारी पत्करली नाही. स्वकर्तृत्वावर ते मोठे झाले. महाराष्ट्र सांस्कृतिक मंडळाचे माजी अध्यक्ष तथा पीपल्स कॉलेजचे पहिले प्राचार्य डॉ. सुरेंद्र बारलिंगे यांनी त्यांच्या 'ओंजळभर पाणी' या आत्मचरित्रात नागोराव जाधव यांचा उल्लेख 'माझा सर्वात लाडका विद्यार्थी' असा केला आहे. आयुष्यामध्ये मानपानाचा विचार न करणाऱ्या व शिक्षण क्षेत्रात अहोरात्र काम करून नावलौकिक मिळविणाऱ्या या थोर शिक्षणतज्ज्ञास २५ व्या स्मृतीदिनानिमित्त विनम्र अभिवादन!

**-बालाजी बापूराव पाटोळे**
सहशिक्षक,
शिवाजी विद्यालय, सिडको, नांदेड.
मो. ८६५७९१३१५९

# शहरातील रस्त्यांची कामे प्राधान्याने पूर्ण करा –मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील रस्त्यांची कामे प्राधान्याने पूर्ण करताना मनपा व सार्वजनिक बांधकाम विभागांनी समन्वय ठेवून रस्त्यांची कामे पूर्णत्वास न्यावेत, असे निर्देश राज्याचे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिले. आज शासकीय विश्रामगृहातील बैठक कक्षात त्यांनी सार्वजनिक बांधकाम मंडळांतर्गत विविध विकास कामांचा आढावा घेतला, यावेळी ते बोलत होते.

यावेळी खासदार डॉ. अजित गोपछडे, मपना आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, सार्वजनिक बांधकाम मंडळाचे अधिक्षक अभियंता संभाजी धोत्रे, कार्यकारी अभियंता रामकृष्ण गळधर, परभणीचे कार्यकारी अभियंता प्रशांत कोरे, हिंगोलीचे कार्यकारी अभियंता दिंगाबर पोत्रे, भोकर कार्यकारी अभियंता विशाल चोपडे, देगलूरचे कार्यकारी अभियंता संदीप कोटलवार आदींची उपस्थिती होती.

शहरातील रस्त्यांची कामे करताना नागरिकांना त्रास होता कामा नये, याची दक्षता घेवून मनपा आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी एकमेकात समन्वय ठेवून कामे तात्काळ पूर्ण करण्यावर भर द्यावा तसेच जिल्ह्यात वृक्ष लागवडी सोबतच वृक्ष संवर्धनावर भर द्यावा असे निर्देश श्री. भोसले यांनी दिले.

काही तालुक्यातील रस्ते खूपच खराब झाले आहेत. वर्दळ, देवस्थान अशा ठिकाणच्या रस्त्यांच्या कामांना प्राधान्य देवून ती कामे वेळेत पूर्ण करा. जिल्ह्यातील जे रस्ते दरवर्षी दुरुस्ती करावी लागतात अशा रस्त्यांना दुरुस्त करताना नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर द्या, असे त्यांनी स्पष्ट केले.

रस्त्यावर दिशादर्शक फलक लावणे, पोलीस वसाहतीच्या इमारतीचे दुरुस्ती व इतर कामे पूर्ण करावेत. किनवट–हदगाव रस्त्यांची कामे, नांदेड शहरातील चौकांचे सुशोभिकरण, शिवाजीनगर भागातील ड्रेनेजची कामे, टोल नाक्यावरील बोगस पावत्या इत्यादी महत्वाचे विषय लवकरात लवकर निकाली काढण्याबाबत त्यांनी संबंधिताना सूचना दिल्या.शासनाच्या १०० दिवसांच्या मोहिमेत सार्वजनिक बांधकाम विभागाने चांगले काम केले असून आता १५० दिवसांच्या मोहिमेत विभाग अव्वल राहील यांची दक्षता प्रत्येकाने घ्यावी, असेही त्यांनी सूचित केले. यावेळी सार्वजनिक बांधकाम मंडळाचे अधिक्षक अभियंता संभाजी धोत्रे यांनी नांदेड, परभणी, हिंगोली जिल्ह्यातील प्रस्तावित विकास कामांची माहिती व विभागातील मनुष्यबळ, पदभरती याबाबतची माहिती सादरीकरणाद्वारे दिली.

# महानगरपालिकेची श्वान निर्बीजीकरण व लसीकरण हेल्पलाईन सेवा कार्यान्वित

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड शहर परिसरात आढळणाऱ्या मोकाट व भटक्या श्वानांच्या तक्रारींवर तात्काळ उपाययोजना करण्यासाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या पुढाकारातून आता महापालिकेने श्वान तक्रार हेल्पलाइन सेवा कार्यान्वित केली असून ही हेल्पलाईन सेवा प्रभावी ठरत आहे. सदर सेवेच्या माध्यमातून नागरिक आपल्या परिसरातील श्वान समस्या अगदी सहज नोंदवू शकतात. प्राप्त तक्रारींवर महानगरपालिकेची संबंधित यंत्रणा तात्काळ कारवाई करत असून, या प्रक्रियेत पारदर्शकता व कार्यक्षमतेचा परिचय मिळतो आहे.



या हेल्पलाईन सेवेमुळे नागरिक व महानगरपालिका यांच्यातील समन्वय वाढत असून, सार्वजनिक आरोग्य व सुरक्षितता या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलल्या गेले आहे. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड व उत्कर्ष ग्लोबल फाऊंडेशन, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने नांदेड शहरात भटक्या व मोकाट श्वानांचे शास्त्रीय व नियमानुसार पळारश्र इळींह उेपीीश्र (इउ) कार्यक्रम राबविण्यात येत आहे. सदर मोहीम झीर्शींशपींळेप`ष र्ीीशश्रीं ीं पळारश्री लीं, १९६०, पळारश्र इळींह उेपीीश्र (ऊेसी) ठीश्रशी, २००१, तसेच पळारश्र थशश्रषरीश इेरीव`ष खपवळर यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रभावीपणे अंमलात आणली जात आहे.

सदरील उपक्रमांतर्गत प्रशिक्षित डॉग कॅचिंग पथक कार्यरत असून, ८६५५४२२९०० या अधिकृत हेल्पलाईन क्रमांकावर प्राप्त होणाऱ्या तक्रारींवर तत्काळ कार्यवाही केली जाते. संबंधित श्वानांना पकडून कार्यान्वीत असलेल्या निर्बीजीकरण व लसीकरण केंद्रात नेण्यात येते, तेथे त्यांचे वैद्यकीय परीक्षण, निर्बीजीकरण व रेबीज प्रतिबंधक लसीकरण करण्यात येते. त्यानंतर nimal Birth Control (Dogs) Rules, २००१ मधील कलम ७(४) नुसार, श्वानांना त्यांच्या मूळ ठिकाणी परत सोडण्यात येते.

या उपक्रमाच्या पार्श्वभूमीवर नेपीळी म्हणजे प्राणीजन्य संसर्गजन्य आजारांविषयीही नागरिकांमध्ये जनजागृती केली जात आहे. यामध्ये रेबीज हा अतिजीवघेणा व गंभीर आजार प्राण्यांपासून मानवामध्ये संक्रमित होतो.

त्यामुळे भटक्या तसेच पाळीव श्वानांचे लसीकरण करणे हे सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने अत्यावश्यक असल्याने महानगरपालिकेमार्फत शाळा, महाविद्यालये व शासकीय कार्यालय तसेच सार्वजनिक ठिकाणी सचित्र माहितीपत्रकांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत असून, नागरिकांना पुढील मार्गदर्शक सूचना दिल्या जात आहेत. भटके/मोकाट किंवा पाळीव श्वान चावल्यास जखम तात्काळ स्वच्छ पाण्याने व साबणाने १५ ते २० मिनिटे धुवावी, कोणतेही घरगुती उपाय जसे की, जखमेवर हळद, चहा पावडर, खाण्याचा चुना इत्यादी वापर करू नयेत, तात्काळ शासकीय दवाखान्यात जाऊन रेबीज प्रतिबंधक लस घ्यावी व डॉक्टरांच्या सल्हानुसार संपूर्ण डोस पूर्ण करावा. नागरीकांनी आपल्या पाळीव श्वानांची महानगरपालिकेकडे नोंदणी करून डॉग लायसन्स प्राप्त करणे तसेच दरवर्षी लसीकरण करणे बंधनकारक आहे, पाळीव श्वानांना सार्वजनिक ठिकाणी नेताना साखळी व मुसक्या वापरणे अनिवार्य आहे. सदर उपक्रमाचा उद्देश शहरामधील नागरीक आणि प्राण्यांमध्ये सुरक्षित सहअस्तित्व साधणे, सार्वजनिक आरोग्य सुरक्षित ठेवणे व प्राणी कल्याणास प्रोत्साहन देणे हा आहे.या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपआयुक्त स.अजितपालसिंघ संधु यांच्या नियंत्रणात पशुशल्य चिकित्सक डॉ.मोहम्मद रईसोद्दीन व लिपिक शांताराम तोबरे यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत. नांदेड शहरातील प्राणी प्रेमी नागरिकांनी आपल्या परिसरात भटके किंवा मोकाट श्वान आढळून आल्यास महानगरपालीका संकेत स्थळावर उपलब्ध अधिकृत हेल्पलाईन क्रमांक ८६५५४२२९०० यावर संपर्क साधून या हेल्पलाइन सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन महापालिका प्रशासना मार्फत करण्यात येत आहे.

## आ. हेमंत पाटील यांनी ढोल ताशाच्या गजरात अण्णाभाऊ साठे यांना केले अभिवादन



**नांदेड (प्रतिनिधी)–** सामाजिक, राजकीय प्रश्नांना आपल्या कवनातून वाचा फोडणारे साहित्यरत्न, लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यासाठी प्रचंड मोठा जनसमुदाय येथील अण्णाभाऊ साठे पुतळा परिसरात जमला होता. मा.बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद ) संशोधन केंद्राचे अध्यक्ष तथा आमदार हेमंत पाटील यांनी सुद्धा ढोल ताशाच्या गजरात मिरवणुकीत सहभागी होऊन साहित्यरत्न,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

छत्रपती शिवाजी महाराज फुले–शाहू– डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि अण्णाभाऊ साठे यांच्या विचारावर हे राज्य हा देश चालत आहे. महापुरुषांचे विचार समाजाला नेहमी प्रेरणा देतात. त्यामुळे त्यांचे विचार येणाऱ्या पिढीकडे संक्रमित करायचे असतील तर त्यांचा वारसा जपला पाहिजे .महापुरुषांनी केलेले कार्य ध्यानी ठेवून आजच्या पिढीने समाजात जनजागृती केली पाहिजे. समाजात जनजागृती व नवनिर्मिती हि शिक्षणाच्या जोरावर होत असते त्यामुळे आजच्या युवा पिढीने शिक्षण घेऊन आपला व आपल्या समाजाचा विकास साधला पाहिजे. आज अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त नांदेड शहरात मोठा उत्साह पाहायला मिळाला भव्य मिरवणूक रॅलीच्या माध्यमातून मोठा जनसमुदाय अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन करण्यासाठी नवा मोंढा येथील अण्णाभाऊ साठे पुतळा परिसरात जमला होता. आमदार हेमंत पाटील यांनी सुद्धा ढोल ताशाच्या गजरात साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन करून मिरवणुकीत बांधवांसोबत सहभाग घेतला. यावेळी आमदार बाबुराव कदम कोहळीकर, शिवसेना जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे, विवेक देशमुख, माजी नगरसेवक बाळासाहेब देशमुख तरोडेकर, लहुजी सेनेचे प्रीतम गवाले, उपजिल्हाप्रमुख सचिन किसावे, जेष्ठ शिवसैनिक जयवंत कदम, विकी गायकवाड यांच्यासह आदी उपस्थित

# मनपाच्या वतीने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन



**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतर्फे दि.१ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता 'साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त त्यांच्या विद्युत भवन, नांदेड येथील पुतळ्यास मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन जयंती निमित्त अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी उपआयुक्त स.अजितपालसिंघ संधु, उपायुक्त सुप्रिया टवलारे, उपायुक्त नितीन गाढवे, मुख्य उद्यान अधिक्षक डॉ.फरहतुल्ला बेग, क्षेत्रिय अधिकारी गौतम कवडे, राजेश जाधव, यांच्यासह मनपाचे कर्मचारी व शहरातील नागरीकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## सिडको क्षेत्रीय कार्यालयात अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** नावा मनपाच्या सिडको क्षेत्रीय कार्यालय येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्यी जयंती साजरी करण्यात आली, यावेळी आयोजक वसुली लिपीक प्रकाश दर्शने यांच्या वतीने मिठाई वाटप करण्यात आली.

१ ऑगस्ट जयंतीनिमित्त अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार कार्यालय अधीक्षक विलास गजभारे यांनी पुष्पहार अर्पण केला.

यावेळी कर निरीक्षक शेख शादुला, वरीष्ठ लिपीक मिना अडबलवार, अर्चना जोंधळे, मुक्ताबाई धर्मकर, वसुली लिपीक मालु एनफळे, सारंग नेरलकर, पवळे, बालाजी लोहगावकर, मदन कोल्हे,शाम आरकुले, ऊतम जौधंळे, बालाजी देवकांबळे, रविंद्र पवळे, नारायण आठवले, संकेत सुर्यवंशी,नवनाथ वाठोरे, गिरी यांची उपस्थिती होती.






## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

पत्ता: वजीराबाद, नांदेड ई–मेल पत्ता infonwerncnanded.org दुरध्वनी (०२४६२) २३४०४

### ई निविदा सूचना कं. नांवाशमनपा /विद्युत/ ६६३९/२०२५–२६

आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम (विद्युत) खात्याकडुन नोंदणीकृत विद्युत कंत्राटदाराकडुन १. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड हद्दीतील गुरुद्वारा प्रभाग क्र. १७ येथिल L.T. पोलवर नविन LED लाईट्स बसविणे बाबत या कामासाठी ब–१ नमुन्यात निविदा ई निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in) येथून डाऊनलोड करण्यात यावे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. निविदा अटी, शर्ती व ई निविदाची सर्व माहीती संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

**स्वा.**
**शहर अभियंता,**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड**

## जाहीर प्रगटन
## कायेदशीर नोटीस

**प्रति,**
**श्री भास्कर पि.काकणाजी गोवंदे**
**रा.श्रद्धा कॉलनी वाडी बु नांदेड**

आमचे पत्रकार श्री अशोक पुरभाजी धुतराज यांनी रजिस्टर पोस्टाने पाठिवलेली नोटीस तुम्ही पोस्टमन सोबत संगनमत करून परत पाठविली तुम्ही तुमचे वाडी बु. येथील घर आमचे पक्षकार श्री अशोक धुतराज यांना विक्री करण्याचा सौदा करून रूपये १५,००००( पंधरा लाख) बयाना घेवून दिनांक २९/२/२०२४ रोजी सौदा चिठ्ठी लिहून दिली. त्यानतर सौदा चिठ्ठी रद्द करण्यात आली. तुम्ही १५,००००( पंधरा लाख) बयाना परत करण्साठी दिनांक ४/४/२०२५ रोजी स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेचा रूपये १५,००००( पंधरा लाख) चेक दिला तो चेक पंजाब नॅशनल बँकेत दिनांक १/७/२०२५ रोजी दाखल केला असता दिनांक २/७/२०२५ रोजी न वटता परत आल.चेक वटला नाही म्हणून आमच्या कार्यालया मार्फत तुम्हास नोंदणीकृत पोस्टाने आमच्या कार्यालयामार्फत तुम्हास नोंदणीकृत पोस्टाने दिनांक ३०/७/२०२५ रोजी नोटीस दिली होती.ती तुम्ही पोस्टमनशी संगनमत करून परत केली.तरी तुम्हास विनंती करण्यात येते की, चेकची रक्कम रूपये १५,००००( पंधरा लाख) तुम्ही आमच्या पक्षकारास पंधरा दिवसात परत करावी नसता तुमच्या विरूद्ध कलम १३८ एन आय ॲक्ट प्रमाणे फौजदारी केस दाखल करण्यात येईल.

दिनांक १/८/२०२५

**ॲड.**
**पी.एन.शिंदे**
**श्यामनगर नांदेड**


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८












लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार
मा.श्री.प्रतापराव पाटील
चिखलीकर
साहेब यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा...!
साहेब औक्षवंत व्हा
शुभेच्छुक
दत्तात्रय पाटील पवार
(सेवानिवृत्त वनअधिकारी,नांदेड)




लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे
लोकप्रिय आमदार
मा.श्री.
प्रतापराव पाटील
चिखलीकर
साहेब आपणास वाढदिवसानिमित्त
हा र्दि क शु भे च्छा!
शुभेच्छुक
कोंडिबा ढाले
सरपंच, ग्रा.पं.कार्यालय, गोळेगाव
पंडितराव कदम
मा.उपसरपंच, धनज (खु.)




मराठवाड्याचे लोकनेते...
मा. खासदार
लोहा-कंधार विधानसभा
मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार
मा.श्री.प्रतापराव पाटील
चिखलीकर व
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस, नां.जि.मध्यवर्ती
सहकारी बँकेचे संचालक तथा माजी सभापती-जि.प.नांदेड
मा.श्री.प्रवीण
पाटील चिखलीकर
04 AUGUST
यांना वाढदिवसाच्या मन:पूर्वक
शुभेच्छा!
शुभेच्छुक
गणेशराव पाटील सावळे
(माजी सदस्य-जिल्हा परिषद, नांदेड)
गणेश पाटील उबाळे मारतळेकर
(माजी सदस्य - पंचायत समिती लोहा)




वाढदिवस अभीष्टचिंतन
04 AUGUST
लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे
लोकप्रिय आमदार
मा.श्री.
प्रतापराव पाटील
चिखलीकर
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस,
नां.जि.मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक
तथा माजी सभापती-जि.प.नांदेड
मा.श्री.प्रवीण
पाटील चिखलीकर
यांना वाढदिवसाच्या मन:पूर्वक शुभेच्छा!
- शुभेच्छुक -
प्रद्युमन सुरेश राठोड
संचालक
हॉटेल जी.एन.एक्झिक्युटीव्ह
वसंतराव नाईक चौक, नांदेड




मन्याड खोऱ्याचा
बुलंद आवाज
लोहा-कंधार विधानसभा
मतदारसंघाचे लोकप्रिय
आमदार
मा.श्री.
प्रतापराव पाटील
चिखलीकर
साहेब आपणास
वाढदिवसानिमित्त
हार्दिक
शुभेच्छा...
शुभेच्छुक
• प्रभाकरराव दिगंबरराव मोरे आंचोलीकर,
• विशाल विनायकराव शिंदे मांजरमकर,
• ऋषीकांत विनायकराव मोरे आंचोलीकर


साहेब औक्षवंत व्हा
आमचे आधारवड व कार्यकुशल नेतृत्व, लोकनेते आमदार
मा. प्रतापरावजी पाटील चिखलीकर
व युवानेते
मा. प्रवीण पाटील चिखलीकर
04 AUGUST
यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
देविदास बस्वदे
जीवनराव वडजे
सुहास मुळे (उपाध्यक्ष प्रतिनिधी)
बाबुराव कैलासे (सचिव)
---- शुभेच्छुक ----
बालासाहेब लोणे, दिलीपराव देवकांबळे, सुधाकर थडके, माणिकराव कदम, संजय अंबुरे, ज्ञानेश्वर फसमले, हनमंत जोगपेटे
अशोक पाटील मारतळेकर (मा. चेअरमन , जि. सहकारी शिक्षण पतपेढी नांदेड)
दत्ता पाटील भोसले (चेअरमन , जि. सहकारी शिक्षण पतपेढी नांदेड)


जनसामान्यांच्या मनातील नेतृत्व
04 AUGUST
लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार
मा.श्री. प्रतापराव पाटील चिखलीकर
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस, नां.जि.मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक तथा माजी सभापती-जि.प.नांदेड
मा.श्री.प्रवीण पाटील चिखलीकर
यांना वाढदिवसाच्या मन:पूर्वक शुभेच्छा!
शुभेच्छुक
भगवान पा. सोमवारे (सरपंच)
सुरेश पा. ढगे (संचालक-कृ.उ.बा.स.लोहा)
उत्तम पा. सोमवारे (मा. चेअरमन)
शिवराज ढगे (मा.सरपंच)
गणेश सोमवारे(मा.सरपंच), व्यंकटी ढगे, संतोष ढगे, शिवराम ढगे, प्रशांत ढगे, संदीप सोमवारे, साईनाथ कोटगिरे, सुभाष सोमवारे, भागवत सोमवारे, राजू सोमवारे, भागवत शिंदे, केशव ढगे, शंकर सोमवारे, बळवंत सोमवारे, गोविंद ढगे, गणेश ढगे, उद्धव ढगे, हरिदास ढगे, बालाजी तेलंगे, रामदास सूर्यवंशी, माधव टोकलवाड, गंगाधर टोकलवाड, विष्णू पवार, मिलिंद पवार, गजानन सूर्यवंशी, तिरुपती रापानवाड


लोकनेते मा.खासदार तथा
मा.आ.प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब
यांच्या वाढदिवसानिमित्त
भव्य कवी संमेलन
कार्यक्रमाचे अध्यक्ष
मा.ना.इंद्रनील मनोहर नाईक साहेब
राज्यमंत्री उद्योग,सार्वजनिक बांधकाम उच्च व तंत्र शिक्षण,आदिवासी विकास, पर्यटन,मृद व जलसंधारण
कार्यक्रमाचे उद्घाटक व सत्कारमूर्ती
मा.प्रतापरावजी पाटील चिखलीकर साहेब
आमदार, लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघ
विशेष अतिथी
मा.भास्करराव पाटील खतगावकर
मा.खासदार तथा मा.राज्यमंत्री
मा.ना.हेमंतभाऊ पाटील
विधान परिषद सदस्य तथा अध्यक्ष, मा.बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्र
मा.आ.राजुभैय्या नवघरे
वसमत विधानसभा मतदारसंघ
विशेष अतिथी
मा.डॉ सुरेश सावंत
ज्येष्ठ साहित्यिक तथा साहित्य आकादमी पुरस्कार प्राप्त(बाल साहित्य)
दिनांक: २ ऑगस्ट २०२५ वेळ: सायं.५ वा.
स्थळ: कै.शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह, नांदेड
प्रमुख पाहुणे
मा.आ.बालाजीराव कल्याणकर - नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघ
मा.मोहणअण्णा हंबर्डे - मा.आमदार, नांदेड दक्षिण
मा.अविनाश घाटे - मा.आमदार
मा.राहुलजी कर्डिले सर - जिल्हधिकारी,नांदेड
मा.अविनाश कुमार सर - पोलीस अधिक्षक,नांदेड
मा.शहाजी उमाप सर - पोलीस महानिरीक्षक,नांदेड
मा.महेश कुमार डोईफोडे - आयुक्त,मनपा,नांदेड
मा.व्यंकटराव गोजेगावकर - प्रदेश उपाध्यक्ष,रा.कॉ.पार्टी
मा.दिलीप धर्माधिकारी - प्रदेश सरचिटणीस रा.कॉ.पार्टी
मा.आ.आनंदराव बोंढारकर - नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघ
मा.ओमप्रकाश पोकर्णा - मा.आमदार तथा जिल्हाध्यक्ष,नांदेड शहर
मा.शिवराज पा.होटळकर - जिल्हाध्यक्ष,रा.कॉ.पार्टी नांदेड द.
मा.प्रविण पाटील चिखलीकर - प्रदेश सरचिटणीस,रा.कॉ.पार्टी
मा.सौ.प्रणितताई देवरे चिखलीकर - प्रदेश उपाध्यक्षा,महिला आघाडी भाजपा
मा.प्रा.सुनिल नानवटे - प्रदेश सचिव,रा.कॉ.पार्टी
मा.बाळासाहेब रावणगावकर - जिल्हाध्यक्ष,रा.कॉ.पार्टी नांदेड उ.
मा.रामदास पा. सोमठाणकर - प्रदेश कार्याध्यक्ष,दिव्यांग आ.रा.कॉ.पार्टी
मा.सौ.सुनंदाताई जोगदंड - महिला जिल्हाध्यक्षा,रा.कॉ.पार्टी
कविवर्य-
नारायण पुरी - छत्रपती संभाजीनगर
निलेश चव्हाण - छत्रपती संभाजीनगर
तुकाराम धांडे - इगतपुरी
किशोर बळी - अकोला
मुकुंद राजपंखे - आंबाजोगाई
प्रभाकर साळेगावकर - माजलगाव
संजीवनी तडेगावकर - जालना
राजेसाहेब कदम - अहमदपूर
केशव खटींग - परभणी
श्रीनिवास मस्के - नांदेड
शंकर राठोड - नांदेड
रोहिणी पांडे - नांदेड
मनोहर बस्वदे - नांदेड
आयोजक- माधव पावडे जिल्हा कार्याध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, नांदेड



वाढदिवसाचे शुभचिंतन साहेब!
मऱ्हाड खोऱ्याचा बुलंद आवाज...
मा.खासदार
लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे
लोकप्रिय आमदार
मा.श्री. प्रतापराव पाटील चिखलीकर
साहेबांना वाढदिवसानिमित्त मन:पूर्वक
शुभेच्छा!
शुभेच्छुक - वडेपुरी सर्कल ता.लोहा जि.नांदेड




राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी
महिला आघाडी
मऱ्हाड खोऱ्याचा बुलंद आवाज...
मा.खासदार
लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे
लोकप्रिय आमदार
मा.श्री. प्रतापराव पाटील चिखलीकर
साहेबांना वाढदिवसानिमित्त मन:पूर्वक
शुभेच्छा!
सौ.संध्या शिंदे जिल्हा कार्याध्यक्षा
कुसुम पेकम जिल्हा उपाध्यक्षा
सौ.रेखा धबाले जिल्हा उपाध्यक्षा
सौ.माधुरी हंबर्डे जिल्हा उपाध्यक्षा
सौ.सुजाता पांपटवार सोशल मिडिया
नाज परविन शेख संघटक,अल्पसंख्याक
सौ.प्रतिभा रत्नपारखी जिल्हा संघटक
संगीता कामठेकर जिल्हा संघटक
डॉ.अर्चना धोटे जिल्हा संघटक
सौ.रेखा येळने जिल्हा समन्वयक
सौ.विज्ञान सुरनर तालुकाध्यक्षा,लोहा
सौ.लक्ष्मी मेथे तालुकाध्यक्षा,कंधार
सौ.अम्रपाली केकाटे शहराध्यक्षा,कंधार
सौ.प्रतिभा नाईकवाडे तालुकाध्यक्षा,बिलोली
सौ.अनिता आनंतरवार तालुकाध्यक्षा,उमरी
सुरेखा गोकावार शहराध्यक्षा,उमरी
सौ.लक्ष्मी जयस्वाल शहराध्यक्षा,उमरी
सौ.गायत्री भावसार तालुकाध्यक्षा,नांदेड
सौ.बेबीताई वर्षावार तालुकाध्यक्षा,भोकर
सौ.रुपाली श्रीकंठवाड शहराध्यक्षा,भोकर
सौ.रुक्मिण कुंचटवाड शहराध्यक्षा,मुदखेड
सौ.माया पालेवार तालुकाध्यक्षा,किनवट
सौ.माधुरी कार्लेकर तालुकाध्यक्षा,नायगाव
सौ.सरुबाई गायकवाड शहराध्यक्षा,बिलोली
सौ.पार्वती मठवाले तालुकाध्यक्षा,मुखेड




राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी,नांदेड जिल्हा
मराठवाड्याचे लोकनेते
मा.खासदार
लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे
लोकप्रिय आमदार
मा.श्री. प्रतापराव पाटील चिखलीकर
साहेबांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !
सौ.वैशाली चव्हाणे मा.अध्यक्षा,जि.प.
व्यंकटराव गोजेगावकर मा.सभापती,जि.प.,नांदेड
शिवराज पा.होटाळकर मा.सभापती,जि.प.
बाळासाहेब रावणगावकर मा.सभापती,जि.प
स्वप्निल चव्हाण मा.सभापती,जि.प.
नागनाथ घिसेवाड मा.सदस्य,जि.प.
डॉ.मीनल पा.खतगावकर मा.सदस्या,जि.प.
गणेशराव सावळे मा.सदस्य,जि.प.
मनोहर पा.तेलंग मा.सदस्य,जि.प.
बाबुराव गिरे मा.सदस्य,जि.प.
सौ.शोभाताई शिंदे मा.सदस्या,जि.प.
सौ.संध्याताई धोंडगे मा.सदस्या,जि.प.
सौ.संगीता गायकवाड मा.सदस्य,जि.प.,नांदेड
सौ.कुशावर्ता भिसे मा.सदस्या,जि.प
बालाजी परदेसी मा.सदस्य,जि.प.
धोंडीराम बोडलवार मा.सदस्य,जि.प.
चंद्रमुनी मस्के मा.सदस्य,जि.प.
साहेबराव धनगे मा.सदस्य,जि.प.
शुभेच्छूक : नांदेड जिल्हा परिषद मा.पदाधिकारी व मा.सदस्य

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

# चॅटजीपीटीशी बोलताना नका करू मन मोकळं...

## अडचणीत येऊ शकता !; ओपनएआयचे सीईओ सॅम ऑल्टमन यांनी स्पष्टच सांगितलं...

**जर तुम्हीही चॅटजीपीटीशी जास्तच मोकळेपणाने बोलत असाल तर सावधगिरी बाळगा. हा इशारा खुद्द चॅटजीपीटीची मूळ कंपनी ओपनएआयच्या सीईओने स्वतः दिली आहे. एका मुलाखतीत सीईओ सॅम ऑल्टमन म्हणाले की, 'लोक त्यांच्या खासगी गोष्टी चॅटजीपीटीसोबत उघडपणे शेअर करतात, परंतु सध्या एआय कोणाच्याही गोपनीयतेची जबाबदारी घेण्यास सक्षम नाही.' अशा परिस्थितीत, तुमच्या खासगी गोष्टी चॅटजीपीटीला सांगणे किंवा कायदेशीर सल्ला घेणे धोकादायक ठरू शकते.**




### सॅम ऑल्टमन काय म्हणाले...

सॅम ऑल्टमन म्हणाले की, 'लोक त्यांच्या आयुष्यातील सर्वात वैयक्तिक गोष्टी चॅटजीपीटीसोबत शेअर करतात. विशेषतः तरुण लोक. असे करणे अजिबात योग्य नाही. जर तुम्ही कोणत्याही मुद्द्यावर थेरपिस्ट किंवा वकिलाचा सल्ला घेतला तर तुमचे शब्द कायदेशीररित्या खासगी मानले जातात. तथापि, चॅटजीपीटी असे अजिबात नाही. सध्या आम्हाला यावर कोणताही उपाय सापडलेला नाही. जे चॅटजीपीटीला त्यांचा मित्र, थेरपिस्ट, वकील किंवा अगदी डॉक्टर मानतात. एकंदरीत, तुम्ही चॅटजीपीटीशी काहीही बोला, ओपनएआय त्यांच्या गोपनीयतेची जबाबदारी घेत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे अमेरिकेत एआयबाबत अजूनही कोणताही स्पष्ट कायदा नाही. अमेरिकेतील काही राज्यांमध्ये गोपनीयतेबाबत नियम आणि कायदे आहेत, परंतु जेव्हा एआयचा विचार केला जातो तेव्हा कायद्याच्या भाषेत काहीही स्पष्ट नाही.



### चॅटजीपीटी चॅट्स साठवतो

चॅटजीपीटी तुम्ही सेव्ह केलेल्या चॅट्स साठवते. यामागील मुख्य कारण द न्यू यॉर्क टाईम्ससोबत सुरू असलेला न्यायालयीन खटला आहे. ज्यामध्ये न्यायालयाने ओपनएआयला चॅट्स सेव्ह ठेवण्यास सांगितले आहे. ओपनएआय या निर्णयाला आव्हान देत आहे, परंतु तोपर्यंत डेटा साठवणे अनिवार्य आहे. अशा परिस्थितीत, तुम्ही समजू शकता की चॅटजीपीटीशी असे बोलणे तुमच्या गोपनीयतेसाठी योग्य ठरणार नाही. विशेषतः जेव्हा कंपनीचे सीईओ स्वतः अशी माहिती देत असतील. येणाऱ्या काळात जेव्हा देशांमध्ये एआयबद्दल स्पष्ट कायदे केले जातील, तेव्हा कदाचित लोकांच्या गोपनीयतेचे अधिक चांगल्या प्रकारे संरक्षण केले जाईल.

# पॅन २.० स्कॅम

## जो लोकांचे बँक खाते करतो रिकामे



**बाजारात एक नवा स्कॅम आला आहे. या स्कॅममध्ये पॅन २.० डाउनलोड करण्याच्या नावाखाली वापरकर्त्यांना अडकवले जात आहे. घोटाळेबाज ईमेलद्वारे अनेकांना बळी बनवत आहेत. वापरकर्त्यांचा वैयक्तिक डेटा, बँक तपशील यासारखी अनेक महत्त्वाची माहिती चोरीला जात आहे. एक चूक आपले संपूर्ण बँक खाते रिकामे करू शकते. दररोज नवीन प्रकारचे स्कॅम बाजारात येतात. कधी लोकांना नोकरीचे खोटे आश्वासन देऊन तर कधी त्यांचे पैसे दुप्पट करण्याचे आमिष दाखवून अनेक प्रकारे फसवले जात आहे. चला तुम्हाला PAN 2.0 SCAM बद्दल सांगूया आणि ते टाळण्याचे मार्ग देखील जाणून घेऊया...**

- विभागाने इशारा दिला : पीआयबी फॅक्ट चेक युनिटने हे ईमेल सोशल मीडियावर पोस्ट केले आहेत आणि लोकांना इशारा दिला आहे. तुम्हाला तुमचे ई-पॅन कार्ड डाउनलोड करण्यासाठी लिंकवर क्लिक करण्यास सांगणारा ईमेल आला आहे का ? हा ईमेल बनावट आहे. त्याचप्रमाणे, आयकर विभागाने असेही स्पष्ट केले आहे की विभाग कधीही असे संदेश पाठवत नाही. खऱ्या पॅन सेवा फक्त .gov.in किंवा .nic.in ने संपणाऱ्या अधिकृत वेबसाइटवर उपलब्ध आहेत.
- भामटे मागतात हे तपशील : बनावट वेबसाइट्स तुम्हाला तुमचा पॅन नंबर, आधार कार्ड तपशील, बँक खात्याचे तपशील आणि इतर वैयक्तिक माहिती विचारतील. सर्व तपशील प्रविष्ट करताच, हा डेटा चोरी, आर्थिक फसवणूक किंवा व्यवहारांसाठी लगेच वापरला जाऊ शकतो. या कारणास्तव, जर तुम्हालाही असा कोणताही ईमेल आला तर तो उघडू नका.
- या गोष्टी लक्षात ठेवा : जर तुम्हालाही अशा घोटाळ्या टाळायच्या असतील तर अशा कोणत्याही संदेश किंवा ईमेलवर प्रतिक्रिया देण्यापूर्वी सर्वप्रथम, ईमेल पत्ता तपासा. तो ईमेल कुठून आला आहे ते पहा. ईमेल किंवा संदेशात दिलेल्या कोणत्याही लिंकवर क्लिक करू नका. प्रथम पूर्णपणे तपासा आणि खात्री केल्यानंतरच लिंकवर क्लिक करा. जर तुम्हाला पॅन इत्यादींमध्ये कोणतेही अपडेट करायचे असेल तर फक्त सरकारच्या अधिकृत पोर्टलवर जा. तुमच्या खात्यासाठी टू फॅक्टर ऑथेंटिकेशन सक्षम करा. जेणेकरून कोणीही तुमचे महत्त्वाचे तपशील चोरू शकणार नाही.

### PAN 2.0 स्कॅम म्हणजे काय ?

ब्लूमब्रेगच्या अहवालानुसार, info@smt.plusoasis.com सारख्या ईमेल पत्त्यांवरून फिशिंग ईमेल पाठवले जातात. या ईमेलमध्ये असे लिहिले आहे की तुमचे पॅन २.० कार्ड मिळवा. या ईमेलमध्ये सरकारी पोर्टलच्या लिंक्ससारखे दिसणारे लिंक्स आहेत. तुम्ही या लिंकवर क्लिक करताच, ते तुम्हाला लगेच फसव्या वेबसाइट्सकडे रीडायरेक्ट करेल.



# फोन सेटिंगजमध्ये किरकोळ बदल, ओव्हरहीटिंगची समस्या होईल दूर!

**स्मार्टफोन जुना झाल्यावर त्यात अनेक समस्या येऊ लागतात. तथापि, काही समस्या अशा आहेत ज्या नवीन स्मार्टफोनमध्ये देखील दिसून येतात. यापैकी एक म्हणजे हँडसेट गरम होणे. स्मार्टफोनमध्ये ओव्हरहीटिंगची समस्या सामान्य आहे. तुम्हाला माहिती आहे का की फोन सेटिंग्जमध्ये काही बदल करूनही गरम होण्याची समस्या कमी करता येते. यासाठी तुम्हाला कोणतेही ऑप्टिमायझेशन ॲप इत्यादी डाउनलोड करण्याची गरज नाही. सेटिंग्जमधील काही गोष्टी बदलून तुम्ही फोनला जास्त गरम होण्याच्या समस्येपासून वाचवू शकता. कसे ते जाणून घेऊया...**

- वाय-फाय स्कॅनिंग बंद करा : स्मार्टफोनच्या सेटिंग्जमध्ये जाऊन, तुम्हाला प्रथम वाय-फाय स्कॅनिंग शोधावे लागेल. वाय-फाय स्कॅनिंग पर्यायासमोरील टॉगलवर टॅप करा आणि ते बंद करा. यासोबत, तुम्हाला ब्लूटूथ स्कॅनिंगदेखील बंद करावे लागेल. हा पर्याय अनेक फोनमध्ये वाय-फाय सेटिंग्जसह उपलब्ध आहे. तथापि, अनेक फोनमध्ये, तुम्हाला वेगळे शोधावे लागू शकते. हे पर्याय बंद केल्याने, फोन बॅकग्राउंडमध्ये वाय-फाय आणि ब्लूटूथ कनेक्शनसाठी स्कॅन करणार नाही. यामुळे फोनच्या प्रोसेसरवर कमी भार पडेल आणि तो जास्त गरम होणार नाही.
- डिस्प्ले सेटिंग्जमध्ये करा बदल : स्मार्टफोनच्या डिस्प्ले सेटिंग्जमध्ये बदल करून तुम्ही ओव्हरहीटिंग रोखू शकता. यासाठी सेटिंग्जमध्ये जा आणि डिस्प्ले पर्यायावर क्लिक करा. आता येथून ऑटो ब्राइटनेस किंवा ॲडॉप्टिव्ह ब्राइटनेस चालू करा. जर फोन खूप गरम झाला तर रिफ्रेश रेट 60Hz वर सेट करा. लक्षात ठेवा की वेगवेगळ्या स्मार्टफोनमध्ये वेगवेगळ्या नावांचे पर्याय असू शकतात.
- डेव्हलपर पर्याय सेटिंग्जमध्ये बदल : फोनच्या सेटिंग्जमध्ये जा आणि नंतर डेव्हलपर पर्यायावर क्लिक करा. आता डेव्हलपर पर्याय अंतर्गत बॅकग्राउंड प्रोसेस लिमिटवर जा आणि ते ३ वर सेट करा. यामुळे ॲप्स बॅकग्राउंडमध्ये चालण्यापासून थांबतील.
- बॅटरीसाठी ही सेटिंग करा : जर तुमचा फोन खूप गरम होत असेल तर तुम्ही बॅटरी सेटिंग्जमध्ये जाऊन पॉवर सेव्हिंग मोड चालू करावा. यामुळे फोनची बॅकग्राउंड ॲक्टिव्हिटी कमी होईल आणि कमी लोडमुळे फोन गरम होणार नाही.

### या गोष्टीदेखील लक्षात ठेवा

आम्ही तुम्हाला सांगतो की सेटिंग्ज बदलण्यासोबतच तुम्ही इतर अनेक गोष्टींची काळजी घेऊ शकता. फोन फक्त मूळ चार्जरने चार्ज करा. तसेच, चार्जिंग करताना फोन वापरू नका. तसेच, चार्जिंगवर ठेवताना फोन कव्हरवरून काढा. उन्हाळ्यात, फोन अशा ठिकाणी ठेवा जिथे तापमान जास्त नसेल. तसेच फोन थेट सूर्यप्रकाशात आणणे टाळा. यामुळे फोनमध्ये जास्त गरम होण्याची समस्या बऱ्याच प्रमाणात कमी होईल. लोकांनी फोनला जास्त गरम होण्यापासून वाचवावे, कारण यामुळे फोनचा स्फोट देखील होऊ शकतो.





# पावसाळ्यात तुमचा फ्रीज योग्य तापमानावर चालतो ?

**पावसाळ्यात घरात असलेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंची काळजी घेण्याची गरज नाही असे लोकांना वाटते. तथापि, असे नाही. प्रत्येक ऋतूनुसार, घरगुती इलेक्ट्रॉनिक उपकरणांची काळजी घेणे आणि त्यांचा वापर करण्याची पद्धत बदलणे आवश्यक आहे. आज आपण बहुतेक घरांमध्ये असलेल्या रेफ्रिजरेटरबद्दल बोलू. रेफ्रिजरेटरमध्ये वेगवेगळ्या ऋतूंनुसार विविध बदल आवश्यक असतात, ज्यामध्ये त्याचे तापमानदेखील समाविष्ट आहे. हो, तुम्हाला माहिती आहे का की रेफ्रिजरेटर पावसाळ्यात कोणत्या तापमानाला चालवावा. तुम्ही कधी याबद्दल विचार केला आहे का ? जर नसेल, तर आज आम्ही तुम्हाला पावसाळ्यात रेफ्रिजरेटर कोणत्या तापमानाला चालवावा आणि ते का करणे आवश्यक आहे हे सांगू...**

पावसात तापमान कमी होते, परंतु आर्द्रता वाढते. अशा परिस्थितीत, दूध, फळे आणि अन्न यासारख्या फ्रिजमध्ये ठेवलेल्या गोष्टी लवकर खराब होण्याचा धोका असतो. अशा परिस्थितीत, प्रश्न असा आहे की लोकांनी त्यांचे फ्रिज कोणत्या तापमानाला चालवावे. जर तुम्ही तापमान कमी ठेवले तर कमी थंडीमुळे अन्न खराब होईल. जर तुम्ही तापमान जास्त ठेवले तर कधीकधी गोष्टींवर बर्फ देखील तयार होतो. या कारणास्तव, फ्रिज कोणत्या तापमानाला चालवावा हे समजून घेणे खूप महत्वाचे आहे.

### या तापमानाला चालवणे चांगले

फ्रिज कोणत्याही ऋतूत १.७ ते ३.३ सेल्सिअस दरम्यान चालवावा. या तापमानात, फ्रिजमध्ये ठेवलेले अन्नदेखील चांगले राहते आणि बॅक्टेरियापासून संरक्षित असते. त्याच वेळी, अनेक तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की पावसाळ्यात फ्रिज ३ तापमानावर चालवावा. जर बाहेरचे तापमान जास्त थंड नसेल तर फ्रिज ३ वर चालवावा. अनेक फ्रिजमध्ये, तुम्ही हे लक्षात घेतले असेल की तापमानासाठी दिलेल्या बटणावर ३ वर पावसाचे चिन्ह असते. ३-४ तापमानात, फ्रिजमध्ये ठेवलेल्या वस्तूंवर बर्फ तयार होत नाही आणि ते खराबही होत नाहीत.

- **या गोष्टी लक्षात ठेवा** : पावसाळ्यात फ्रिज वारंवार उघडणे टाळा. जेणेकरून थंडावा चांगला राहील. तसेच, जर फ्रिजमध्ये ठेवलेल्या अन्नावर बर्फाचे थेंब पडत असतील, तर तापमान कमी करावे. तसेच, फ्रिजमागील कॉइल स्वच्छ करावी.
- **फायदे :** फ्रिजचे तापमान योग्य ठेवल्याने बॅक्टेरिया वाढण्यापासून रोखता येतात. फ्रिजमध्ये ठेवलेल्या वस्तू दीर्घकाळ ताज्या आणि चांगल्या राहतात. तसेच, योग्य तापमानामुळे फ्रिजमध्ये ठेवलेल्या अन्नाची चव कमी होत नाही.

# पेटीएम, फोनपे, गुगलपेवर तपासा CIBIL स्कोअर

**कर्ज घेण्यापूर्वी तुम्हाला तुमचा CIBIL स्कोअर कसा आहे हे माहीत असले पाहिजे. असे अनेक ॲप्स आहेत जे CIBIL स्कोअर पाहण्याची सुविधा देतात. तथापि, आजच्या काळात कोणीही त्यांच्या स्मार्टफोनमध्ये जास्त ॲप्स डाउनलोड करू इच्छित नाही. यामुळे स्टोरेज भरणे यासारख्या समस्या उद्भवतात. तुम्हाला माहिती आहे का की तुमच्या फोनमध्ये आधीच असे अनेक ॲप्स आहेत जे तुम्हाला CIBIL स्कोअर सांगतात ? हो, तुम्ही फोन पे, गुगल पे आणि पेटीएम सारख्या ऑनलाइन व्यवहार ॲप्सवरून देखील CIBIL स्कोअर तपासू शकता.**




### CIBIL स्कोअर म्हणजे काय ?

सर्वप्रथम, तुम्हाला CIBIL स्कोअर म्हणजे काय हे जाणून घेणे खूप महत्वाचे आहे. CIBIL स्कोअर हा तुमच्या क्रेडिटचा हिशोब आहे. म्हणजेच, CIBIL स्कोअर क्रेडिट इतिहासावर आधारित असतो. क्रेडिट इतिहास तुम्ही आतापर्यंत घेतलेले कर्ज वेळेवर फेडले आहे की नाही यावर अवलंबून असतो. त्याचे व्याज वेळेवर भरले आहे की नाही यावर अवलंबून असते. CIBIL स्कोअरची श्रेणी ३००-९०० दरम्यान आहे. CIBIL स्कोअर वाईट, चांगला आणि उत्कृष्ट या आधारावर मोजला जातो. तुमचा स्कोअर जितका चांगला असेल तितका तुम्हाला त्या आधारावर रेटिंग मिळेल. बँका तुम्हाला त्या आधारावर कर्ज देतील.

### असा तपासा...

- पेटीएम : तुम्ही Paytm वरून CIBIL स्कोअर देखील तपासू शकता. यासाठी तुम्हाला ॲप उघडावे लागेल. होम पेजवर तुम्हाला मोफत टूल्सचा एक विभाग दिसेल. त्यामध्ये चेक युअर लेटेस्ट क्रेडिट स्कोअर या पर्यायावर क्लिक करा. नंतर तुमचे नाव एंटर करा आणि स्कोअर तपासा.
- गुगल पे : तुमच्या फोनवर गुगल पे ॲप उघडल्यानंतर, खाली स्क्रोल करा. यानंतर, तुम्हाला चेक युअर सिबिल स्कोअर फॉर फ्री हा पर्याय दिसेल. त्यावर क्लिक करा. आता चेक स्कोअर वर क्लिक करा आणि तुमचा सिबिल स्कोअर तपासा.
- फोनपे : फोनपे वरून सीबिल स्कोअर तपासण्यासाठी, प्रथम ॲप उघडा. त्यानंतर, तुम्हाला होम पेजवर लोन्सचा पर्याय दिसेल. हा पर्याय रिचार्ज आणि बिलांच्या खाली असेल. यानंतर, तुम्हाला चेक क्रेडिट स्कोअरच्या पर्यायावर क्लिक करावे लागेल. ते तुम्हाला काही तपशील जोडण्याची परवानगी मागेल. त्यानंतर ते तुम्हाला तुमचा सिबिल स्कोअर दाखवेल.





04 AUGUST
लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे
लोकप्रिय आमदार
मा.श्री.
प्रतापराव पाटील चिखलीकर
राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस,
नां.जि.मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक
तथा माजी सभापती-जि.प.नांदेड
मा.श्री.प्रवीण पाटील चिखलीकर
यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!
अशोकराव पाटील जाधव सुगावकर
चेअरमन
सुधाकर पाटील जाधव
व्हा. चेअरमन
संचालक : नरहरी पाटील, राजेश्वर पाटील, मनोहर कदम,
बालाजी पाटील, माधवराव पाटील मुकदम, उद्धव पाटील, धोंडीबा सिरसे
प्रकाशक :- सेवा सहकारी सोसायटी लि. सुगाव, ता. लोहा, जि. नांदेड.




लोहा-कंधार विधानसभा
मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार
मा.श्री.प्रतापराव पाटील
चिखलीकर
यांच्या वाढदिवसानिमित्त
हा र्दि क शु भे च्छा!
शुभेच्छुक
सुरेश जोशी
रणजीत उधाणे




लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे
लोकप्रिय आमदार मा.श्री.
प्रतापराव पाटील
चिखलीकर
साहेब आपणास वाढदिवसानिमित्त
हार्दिक
शुभेच्छा!
शुभेच्छुक
भिमराव लामदाडे
सरपंच प्रतिनिधी टाकळगाव ग्रामपंचायत
ता.लोहा जि.नांदेड




वाढदिवस
शुभेच्छा
साहेब
तुमचा वाढदिवस
जणू आमच्यासाठी
एक आनंदाचा क्षण,
तुम्हाला उदंड आयुष्य लाभो
हिच ईश्वर चरणी प्रार्थना..
मराठवाड्याचे लोकनेते
मा.खासदार
लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे
लोकप्रिय आमदार
मा.श्री. प्रतापराव पाटील
चिखलीकर
साहेबांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक
शुभेच्छा!
शुभेच्छुक :-
श्री.स्वप्नील शेषराव चव्हाण
(मा.समाजकल्याण सभापती जि.प.नांदेड)
सौ.वैशालीताई स्वप्नील चव्हाण
श्री.सुशांत शेषराव चव्हाण
श्री.तेजस स्वप्नील चव्हाण
श्री.अमोल उत्तम चव्हाण




उगवता सूर्य
आपणांस आशीर्वाद देवो,
बहरलेली फुले आपणास
सुगंध देवो व
प्रार्थना ईश्वरचरणी
आपणास सदैव
सुखात ठेवो
वाढदिवस
शुभेच्छा
राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी
नांदेड जिल्ह्याचे नेते
नांदेड जिल्ह्याचे माजी खासदार
तथा लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे
लोकप्रिय आमदार
श्री.प्रतापराव
पाटील चिखलीकर
यांना वाढदिवसाच्या
मनःपूर्वक शुभेच्छा!
- शुभेच्छुक -
बाळासाहेब पाटील रावणगांवकर
जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी,नांदेड उत्तर


लोहा- कंधार विधानसभेचे
कार्यसम्राट
लोकप्रिय आमदार
मा. श्री. प्रतापराव
पाटील चिखलीकर
साहेब
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
Printing World 9730801285
मोहसिन खान पठाण जिल्हाध्यक्ष शहर राष्ट्रवादी युवक काँग्रेस, नांदेड


लोहा–कंधार विधानसभा मतदारसंघाचे
लोकप्रिय आमदार मा. श्री.
प्रतापराव पाटील
चिखलीकर
साहेब आपणास वाढदिवसानिमित्त
हा र्दि क शु भे च्छा!
- शुभेच्छुक -
मनोहर पाटील भोसीकर
तालुका अध्यक्ष :- राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, कंधार


वाढदिवसाचे शुभचिंतन!
लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे
लोकप्रिय आमदार
मा.श्री.प्रतापराव पाटील
चिखलीकर साहेब
व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महाराष्ट्र
प्रदेश सरचिटणीस
मा.प्रवीण प्रतापराव पाटील
चिखलीकर
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!
वाढदिवस
शुभेच्छा!
उगवता सूर्य आपणांस
आशीर्वाद देवो,
बहरलेली फुले आपणास
सुगंध देवो,
व परमेश्वर आपणास
सदैव सुखात ठेवो!
जननायक
तालुकास्तरीय चित्रकला स्पर्धा
वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम!
माती पासून गणेश मूर्ती कला
प्रथम पारितोषक 5555/-
मा.शिवराज पाटील होटाळकर
जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी नांदेड (द.)
द्वितीय पारितोषक 3333/-
मा.गणेश पाटील पवार सरपंच ग्रामपंचायत होटाळ
तृतीय पारितोषिक 2222/-
मा.राहुल पाटील नकाते उपसरपंच ग्रामपंचायत होटाळ
प्रथम पारितोषक 3333/-
मा.शिवराज पाटील होटाळकर
जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी नांदेड (द.)
द्वितीय पारितोषक 2222/-
मा.गणेश पाटील पवार सरपंच ग्रामपंचायत होटाळ
तृतीय पारितोषिक 1111/-
मा.राहुल पाटील नकाते उपसरपंच ग्रामपंचायत होटाळ
प्रोत्साहन पद दोन बक्षीस
भव्य रक्तदान शिबिर
मधुमेह तपासणी शिबिर
नेत्र तपासणी शिबिर
त्वचा तपासणी शिबिर
शुभेच्छुक
शिवराज पाटील होटाळकर
जिल्हाध्यक्ष, रा. काँ. पा. नांदेड (द.)
मा.शिक्षण सभापती, जिल्हा परिषद नांदेड
मा.उपसभापती, कृ.उ.बा.स. नायगांव
ADD PRO 9579710092
शुक्रवार, दि. ८ ऑगस्ट २०२५ वेळ : सकाळी ०९:३० वा. स्थळ : स्व. डी.बी.पाटील स्मृतीस्थळ, मिनेलीअम पब्लिक स्कूल अ‍ॅन्ड ज्युनियर कॉलेज, नायगाव.


आमचे नेते..!
लोहा-कंधार विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय आमदार
मा.श्री प्रतापरावजी पाटील
चिखलीकर साहेब
आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!
घड्याळ तेच
वेळ नवी
बालाजी पाटील शिंदे
जिल्हाध्यक्ष:राष्ट्रवादी युवक काँग्रेस,नांदेड


साहेब
औक्षवंत व्हा
लोहा-कंधार विधानसभा
मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार
मा.श्री.प्रतापराव पाटील
चिखलीकर
व
मा.श्री प्रविण पाटील
चिखलीकर
यांना वाढदिवसाच्या
मन:पूर्वक शुभेच्छा!
४ ऑगस्ट
शुभेच्छुक
दिलीपराव मोहनराव पाटील सुगावकर
मा.चेअरमन, से.स.सो.लि.सुगाव, ता.लोहा
सौ.भगीरथाबाई दिलीपराव पाटील सुगावकर
मा.सरपंच, ग्रा.पं. कार्यालय, सुगाव तथा मा.संचालिका कृ.उ.बा.स.लोहा
सौजन्य : प्रा.श्रीधर दिलीपराव पा.जाधव, प्रा.विलास दिलीपराव पा.जाधव व सर्व ग्रामस्थ, सुगाव


आमचे प्रेरणास्थान, मार्गदर्शक
लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे
लोकप्रिय आमदार
आदरणीय
श्री.प्रतापरावजी
पाटील चिखलीकर
साहेब आपले
अभीष्टचिंतन...!
शुभेच्छुक
इंजि.शुभम वसंत राठोड
F.M.G शाखा जामनगर, गुजरात
वसंत के.राठोड
सेवानिवृत्त प्राचार्य